रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३४३ | पृष्ठे १० | RGD/016/2026-28 www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २२ मे २०२६

किंमत ४ ₹

## 'कॉकरोच'चं एक्स अकाऊंट सस्पेंड

**मुंबई :** महाराष्ट्रातील ३० वर्षीय तरुण अभिजीत दीपके या तरुणाने सोशल मीडियावरून कॉक्रोच जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला होता. त्यानंतर या पक्षाच्या अकाऊंटला तरुणाईचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत होता. अवघ्या चार दिवसांत या पक्षाच्या इंस्टाग्राम अकाऊंटने फॉलोअर्सच्या बाबतीत भाजपच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटलाही मागे टाकले. त्यामुळे देशभर या पक्षाची चर्चा सुरू आहे. असे असतानाच आता या पक्षाचे ट्विटर अकाऊंट सस्पेंड करण्यात आले आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या ट्विटर अकाऊंटला गेल्या चार पान २ वर

## गेलविरोधात शेतकरी आक्रमक

**पेण :** गेल इंडिया कंपनीच्या गॅस पाईपलाईन प्रकल्पाविरोधातील आंदोलनाला आता अधिक आक्रमक वळण मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. २४ गाव संघर्ष समितीच्या वतीने पेण येथील महात्मा गांधी वाचनालयात आयोजित बैठकीत आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सीआरझेड परवानगीसह विविध मुद्द्यांवर कायदेशीर लढाईसोबतच रस्त्यावर उतरून जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. याच पार्श्वभूमीवर २८ मे रोजी मुंबई-गोवा महामार्गावर धरणे आंदोलन करण्याची पान २ वर

# 30 जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी ?

## पुन्हा सरकारची घोषणा | बळीराजाच्या मनातील संभ्रत अद्याप कायम




### कर्ज वाटप करताना सीबील स्कोअर मागू नका; बँकांना निर्देश

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**राज्यातील लाखो शेतकरी गेली अनेक महिने कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असताना अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी पूर्ण करण्याची घोषणा केली आहे. मात्र, यापूर्वीही अनेकदा आश्वासने आणि घोषणा झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीत विलंब झाल्याने 'यावेळी खरंच कर्जमाफी होणार का?' असा सवाल आता शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. सरकारच्या नव्या घोषणेमुळे आशा निर्माण झाली असली तरी प्रत्यक्षात कर्जमाफी होणार का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.**

खरीप हंगामाच्या पूर्वतयारी बैठकीनंतर मुख्यमंत्री माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी येत्या ३० जूनपूर्वी कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे पुढील खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असा दावा त्यांनी केला. परंतु, प्रत्यक्षात कर्जमाफी होईल, का याकडे बळीराजाचे डोळे लागले आहेत.कर्जवाटप करताना शेतकऱ्यांकडून सीबील स्कोअरची मागणी करू नये, तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण करू नये, असे स्पष्ट निर्देश सर्व बँकांना देण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली असली तरी प्रत्यक्षात खरंच या सर्वाची अंमलबजावणी होणार का, याबाबत शेती संभ्रावस्थेत आहेत. कारण, याअधीसुद्धा सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला आश्वासनांची पाने पुसण्याचे काम केले आहे. त्यामुळे या सरकारवर शेतकऱ्यांचा काडीमात्र विश्वास राहिलेला नाही. पान २ वर

### राज्य सरकारच्या कसोटीचा काळ

**गेली अनेक महिने शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. केवळ घोषणा करून सरकार वेळ मारून नेत आहे. प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना लाभ मिळणार, निधी कुठून आणणार आणि बँकांची थकबाकी कधी फिटणार याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीही अनेक वेळा कर्जमाफीच्या घोषणा झाल्या, मात्र अटी-शर्थी आणि प्रक्रियेमुळे हजारो शेतकरी वंचित राहिले. त्यामुळे ३० जूनपूर्वी खरोखरच कर्जमाफी होणार का, की हीदेखील निव्वळ राजकीय घोषणा ठरणार? असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला आहे.**

# शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची गुंडगिरी

- **महादेवखारमधील शेतकऱ्याला बेदम मारहाण**
- **पोलिसांवरही दबावाचे आरोप**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

'शेतकरी जगला पाहिजे' अशा घोषणा देणाऱ्या महायुती सरकारमधीलच शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांकडून एका शेतकऱ्याला बेदम मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार रायगड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. रोहा तालुक्यातील महादेवखार गावात किरकोळ कारणावरून एका शेतकऱ्याला शिवीगाळ आणि मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची वाढती दादागिरी पुन्हा एकदा चर्चेत आली असून, आता शेतकरीदेखील सुरक्षित नसल्याचे चित्र पान २ वर

### आमदारांच्या फोननंतर आरोपीचे नाव गायब ?

शेतकरी अनिल मोरे मारहाणीची तक्रार नोंदवित असताना मंगेश कांबळे हे थेट पोलीस ठाण्यात दाखल झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना ''आमदारांशी बोला'' असे सांगत मोबाईल फोन दिला. त्यानंतर पोलिसांचे आणि संबंधित आमदारांचे मोबाईलवर संभाषण झाले. मात्र, त्यानंतर तिसरा आरोपी असलेल्या मंगेश कांबळे याचे नाव तक्रारीत घेण्यास पोलीस कर्मचाऱ्यांनी टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. आमदारांच्या फोननंतर आरोपीचे नाव तक्रार नोंदवहीतून वगळण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगू लागली असून, त्यामुळे पोलिसांच्या निष्पक्ष कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एका शेतकऱ्याला न्याय मिळवण्यासाठीही राजकीय दबाव सहन करावा लागत असेल, तर सामान्य नागरिकांनी कुणाकडे पाहायचे? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## वे|ध|क





### भीषण अपघातात एकाचा मृत्यू

**महाड :** महाड तालुक्यातील वरंडोली गावाच्या हद्दीत बाईक आणि कारमध्ये झालेल्या भीषण अपघातात एका बाईकस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वरंडोली गावातील रहिवासी राजेश बापू जाधव हे गुरुवारी दुपारच्या सुमारास आपल्या घराकडून महाडच्या दिशेने बाईकवरून जात होते. त्यावेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने त्यांच्या बाईकला जोरदार धडक दिली. पान २ वर

### गांजा विक्रेत्याला बेड्या

**उरण :** उरण तालुक्यात वाढत्या अंमली पदार्थांच्या पार्श्वभूमीवर न्हावा-शेवा पोलिसांनी करळ फाटा परिसरात धडक कारवाई करत गांजा विक्रीसाठी फिरणाऱ्या एका तरुणाला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी गांजा आणि मोबाईल असा सुमारे २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १९ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९.०५ वाजण्याच्या दरम्यान करळ फाटा ब्रिजखाली, करळ गाव परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलीस शिपाई प्रविण गावित यांनी दिलेल्या फिर्यादीवरून न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात पान २ वर

### पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड खल्लास

**नवी दिल्ली :** १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड हमजा बुरहान याचा मृत्यू झाला आहे. अज्ञात हल्लेखोराने केलेल्या गोळीबारात हमजा बुरहान ठार झाला. ही घटना पाकव्याप्त काश्मीरमध्ये घडल्याची माहिती मिळाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार दहशतवादी हमजा बुरहान याला पाकिस्तानात एका अज्ञात व्यक्तीने गोळ्या घालून ठार केले. दहशतवादी हमजा बुरहानवर पाकिस्तानातील मुझफ्फराबाद येथे गोळीबार करण्यात आला. हमजा बुरहान हा २०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांपैकी एक होता.

# अलिबागकरांचे स्वप्न साकार

## स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल नागरिकांसाठी खुले






**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग शहराच्या क्रीडा आणि आरोग्य क्षेत्राला नवी ओळख देणारे अत्याधुनिक, सर्व सुविधांनी सुसज्ज असे 'स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल' नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. अलिबागच्या माजी नगराध्यक्षा स्वर्गीय नमिता नाईक यांच्या स्वप्नातून साकारलेल्या या भव्य क्रीडा संकुलामुळे अलिबागकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा संपली असून, शहराच्या पान २ वर

# वळवलीत जलजीवन योजनेचा बोजवारा

## ठेकेदाराच्या मनमानीमुळे ग्रामस्थ संतप्त





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेंतर्गत 'प्रतिव्यक्ती ५५ लीटर पाणी' देण्याचा गाजावाजा करण्यात आला. मात्र, अलिबाग तालुक्यातील वळवली गावात या योजनेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तब्बल तीन वर्षे उलटूनही योजना पूर्ण झाली नसून, निकृष्ट दर्जाचे बांधकाम, उघड्यावर टाकलेले पाइप, कोसळलेला स्लॅब आणि रखडलेली कामे यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे गावकऱ्यांना आजही पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने बेलोशीचे माजी सरपंच राजेंद्र चवरकर यांनी ग्रामविकास विभाग आणि जिल्हा परिषदेकडे लेखी तक्रार दाखल करत कारवाईची मागणी केली आहे.

अलिबाग तालुक्यातील बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील वळवली गावाची लोकसंख्या सुमारे १२०० आहे. या गावातील नागरिक अनेक वर्षांपासून उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. पान २ वर

# वनवलीत सागाच्या झाडांची कत्तल





- **भराव आणि खोदकामाने पर्यावरण धोक्यात**
- **महसूल, वनविभाग अद्याप निद्रावस्थेत**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

सागाची झाडे तोडणे हा कायद्याने गंभीर गुन्हा मानला जात असतानाही रायगड जिल्ह्यातील वनवली गावात एका धनदांडग्याने तब्बल दोन एकर परिसरातील सागाच्या झाडांची बेसुमार कत्तल केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढ्यावरच न थांबता संबंधित जागेत मोठ्या प्रमाणात मातीचा भराव आणि खोदकामही सुरू करण्यात आले असून, महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे कानाडोळा केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

रायगड जिल्ह्यातील वनवली हे गाव निसर्गरम्य परिसरासाठी ओळखले जाते. खानाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणाऱ्या या गावालगतच्या जागेत कोणतीही शासकीय परवानगी न घेता वीसहून अधिक सागाच्या झाडांची कत्तल करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणावर खोदकाम करून मातीचा भराव टाकण्यात आला आहे.

नियमांनुसार अशा प्रकारचे वृक्षतोड, भराव किंवा खोदकाम करण्यासाठी महसूल आणि वन विभागाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असते. मात्र, संबंधितांनी कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, झाडांची कत्तल झाल्यानंतर वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले होते, तरीही अद्याप पान २ वर

### दिल्ली-मुंबई कॉरिडॉर थेट कळंबोलीपर्यंत

**पनवेल:** देशातील महत्त्वाकांक्षी दिल्ली-मुंबई कॉरिडॉर प्रकल्प आता थेट कळंबोली सर्कलपर्यंत पोहोचण्याच्या दिशेने वेगाने पुढे सरकत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पनवेल तालुक्यातील मोरबे जंक्शनपासून कळंबोली सर्कललगतच्या आसूडगावपर्यंत नवीन जोडमार्ग उभारण्याची प्रक्रिया सुरू केली असून, त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

पूर्वी हा महामार्ग विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला जोडण्याचे नियोजन होते. मात्र त्या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादन आणि तांत्रिक अडचणींमुळे काम रखडल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पर्यायी मार्गाचा पर्याय स्वीकारला आहे. पान २ वर




**कौटुंबिक कथानकाला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद | कलाकारांचा अभिनय अन् मेहनतीचे कौतुक**

# 'स्वप्न सुखाचे पाहताना...'

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पीएनपी कलाविकास मंडळ आयोजित नाट्यप्रभा महोत्सवात दि. १९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता सादर करण्यात आलेले 'स्वप्न सुखाचे पाहताना...' हे नाटक प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले. कौटुंबिक नात्यांमधील ताणतणाव, गैरसमज आणि शेवटी नात्यांचे महत्त्व अधोरेखित करणारी कथा प्रभावीपणे रंगमंचावर उभी करण्यात आली.



या नाटकाचे निर्माते ॲड. विवेक पाटील असून, लेखक गजानन महादेव पाटील यांनी वास्तवदर्शी आणि भावनिक कथा मांडली. दिग्दर्शनाची धुरा प्रमोद राम पाटील यांनी समर्थपणे सांभाळली.

नाटकाची कथा एका सुखी संसाराभोवती फिरते. लग्नानंतर नवऱ्याच्या आयुष्यात दुसऱ्या स्त्रीचे आगमन झाल्याने संसारात मतभेद निर्माण होतात. त्या मोहात अडकलेला नवरा आपल्या पत्नीला त्रास देऊ लागतो आणि तिला माहेरी पाठवतो. मात्र, त्याचा एक मित्र आणि घरातील नोकर त्याला योग्य मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करतात. शेवटी नायकाला आपल्या चुकीची जाणीव होते आणि पुन्हा एकदा नवरा-बायको सुखाने संसार करू लागतात. कौटुंबिक मूल्ये जपणारी आणि समाजाला संदेश देणारी ही कथा प्रेक्षकांना भावली.

नाटकातील कलाकार लाभेष पाटील, जान्हवी माने, नंदू पाटील, सुनील बुरुमकर, बाळकृष्ण कोठेकर, प्रकाश खरसंबळे, सुभाष म्हात्रे आणि श्रेवल म्हात्रे यांनी आपल्या भूमिकांना पूर्ण न्याय दिला. सर्वच कलाकारांनी उत्कृष्ट अभिनय सादर करत प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

यावेळी मंडळातील ज्येष्ठ रंगकर्मी तसेच मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला. चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते मानपत्र आणि अनुदान देऊन मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

# नारंगीतील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा

## •राजेंद्र म्हात्रेंच्या पुढाकारातून अद्ययावत विहिरीचे काम सुरू



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील नारंगी गावातील नागरिकांच्या पाणीटंचाईच्या समस्येला आता अखेर दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र गंगाधर म्हात्रे यांच्या पुढाकारातून भुवनेश्वर परिसरात अत्याधुनिक आणि मोठ्या क्षमतेची विहीर उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असून, या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. या विहिरीमुळे नारंगी गावासह नारंगी नवीन वसाहतीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अमोल पाटील यांनी दिली.

अलिबाग तालुक्यातील अनेक भागांमध्ये पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शासनाकडून विविध योजना जाहीर होत असल्या तरी अनेक गावांमध्ये अद्याप ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. त्यामुळे नागरिकांना आजही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. मात्र, नारंगी ग्रामस्थ मंडळ आणि ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र म्हात्रे यांनी या प्रश्नावर स्वतः पुढाकार घेत पाणीटंचाई दूर करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.

नारंगी गाव आणि नारंगी नवीन वसाहतीतील नागरिकांना मुबलक व शाश्वत पाणीपुरवठा व्हावा, या उद्देशाने नारंगी ग्रामस्थ मंडळाने स्वतः च्या मालकीची जागा विहिरीसाठी उपलब्ध करून दिली आहे. तर ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र म्हात्रे यांनी सामाजिक बांधिलकी जपत या विहिरीच्या बांधकामाचा संपूर्ण खर्च स्वतः उचलण्याचा निर्णय घेतला आहे.

उभारण्यात येणारी ही विहीर तब्बल ३० फूट खोल आणि ३५ फूट रुंद असणार आहे. विहिरीचे बांधकाम पूर्णपणे चिरांच्या दगडांमध्ये करण्यात येणार असून, मजबूत आणि दीर्घकालीन रचना उभारण्यावर भर दिला जात आहे. सध्या विहिरीच्या कामाला वेगाने सुरुवात झाली असून, येत्या महिनाभरात हे काम पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

> नारंगी ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वर परिसरात नारंगी ग्रामस्थ मंडळाच्या मालकीची जागा होती. ही जागा पूर्वीपासून पाण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आली होती. ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र गंगाधर म्हात्रे यांच्या पुढाकारातून त्या ठिकाणी विहीर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे गावातील पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल.
> – हरिश्चंद्र म्हात्रे, अध्यक्ष, नारंगी ग्रामस्थ मंडळ

कामाच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास अडथळा निर्माण होऊ नये यासाठी स्वतंत्र जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. नारळ वाढवून या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नारंगी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष हरिश्चंद्र म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र गंगाधर म्हात्रे, अनिल धुमाळ,

> नारंगी ग्रामस्थ मंडळाने पाण्याच्या प्रश्नासाठी जागा उपलब्ध करून दिली. त्या जागेत विहीर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या बांधकामाचा सर्व खर्च मी स्वतः करत आहे. ही विहीर पूर्ण झाल्यानंतर गावातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध होईल.– राजेंद्र म्हात्रे,
> ग्रामपंचायत सदस्य

अमोल पाटील, भालचंद्र म्हात्रे, नरेश म्हात्रे, संजीव पाटील, शेखर धुमाळ, वैभव धुमाळ, ओमकार बहाडकर, प्रभाकर ठाकूर, संजय म्हात्रे, मोहन पाटील, रमाकांत म्हात्रे, प्रदीप पाटील, विक्रम पाटील, सचिन पाटील, पार्थ पाटील, प्रदीप धुमाळ, प्रभाकर म्हात्रे, नरहरी म्हात्रे, तेजस म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेळाच्या मैदानात मद्यपानाचे प्रकार

**पनवेल :** खारघर सेक्टर १६ येथील खेळाच्या मैदानावर पालिकेने सुरक्षा रक्षकांची संख्या कमी केल्यानंतर पुन्हा मद्यपींचा वावर वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी मैदानावर दारू पार्ट्या होत असल्याचे समोर आले आहे. यापूर्वीही या मैदानावर मद्यपानाचे प्रकार उघडकीस आल्यानंतर स्थानिक जय हिंद स्पोर्ट क्लब यांनी पालिकेकडे तक्रार केली होती. त्यानंतर काही काळासाठी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. मात्र, अलीकडेच रक्षकांची संख्या कमी होताच पुन्हा गैरप्रकार सुरू झाल्याचे दिसून येत आहे.


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. सुनील लहू म्हात्रे २. सौ. धनश्री सुनील म्हात्रे, यांनी मौजे मिरचोली, ता. कर्जत जि. रायगड, येथील जमीन मिळकतींचे मालक १. श्री. संदीप मारुती घरत, २. श्री. सुनील यशवंत पालांडे, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीच्या आणि भोगवटादरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मिरचोली | १८/१३ | ०.२४.०० | ०.२० |
| मिरचोली | ८/४३ | ०.०६.०० | ०.०६ |
| मिरचोली | ८/४४ | ०.०१.०० | ०.०३ |

सदरहू जमीन मिळकती या मिळकतींचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात तसे जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावरून दिसून येत आहे. सदर जमीन मिळकती त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतींमध्ये कुणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, वगैरे कुठलाही हक्क, बोजा किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची काहीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमीनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २१/०५/२०२६

**हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**ॲड. वैभव अशोक शिंदे**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ७७४४८५१४६९/७०५८८५१२२१


# पान १ वरून

## गेलविरोधात शेतकरी आक्रमक

घोषणाही करण्यात आली.

दरम्यान, गेल कंपनीची गॅस पाईपलाईन उरण, पनवेल, पेण आणि अलिबाग या चार तालुक्यांतून जात असून, अनेक शेतकऱ्यांनी मोबदला स्वीकारल्याची माहिती बैठकीत समोर आली. उरण तालुक्यातील बहुतांश काम पूर्ण झाली असून, अलिबागमध्ये सुमारे ८० टक्के काम पूर्णत्वाकडे गेले आहे. पेण तालुक्यातील १३ गावांमध्येही पाईपलाईनचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याने आंदोलनाची ताकद आणि पुढील दिशा यावरच प्रश्न निर्माण झाले आहेत.या बैठकीला २४ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, अशोक मोकल, नंदा म्हात्रे, राजन झेमसे, हर्षल पितळे यांच्यासह अनेक शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'कॉकरोच'च एक्स अकाऊंट सस्पेंड

दिवसांत दोन लाखांहून अधिक नेटकऱ्यांनी फॉलो केले होते. गुरुवारी सकाळी कॉक्रोज पार्टीच्या इंस्टा हँडलने फॉलोअर्सच्या बाबतीत भाजपच्या अधिकृत हँडलला मागे टाकल्यानंतर संपूर्ण देशभरात त्याची जोरदार चर्चा झाली. दरम्यान, या पक्षाचे अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी त्यांचे अधिकृत अकाऊंट हॅक करण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावादेखील गुरुवारी केला होता. त्यानंतर काही वेळातच पक्षाचे एक्स अकाऊंट सस्पेंड करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी देशातील तरुणांना उद्देशून झुरळ संबोधले होते. या संदर्भाने उपरोधिक स्वरूपात सदरील पक्षाची सोशल मीडियावर स्थापना झाली असून, तरुणांना ही कल्पना प्रचंड आवडली आहे. मूळचा छत्रपती संभाजीनगर येथील असलेल्या अभिजीत दीपके याने हा पक्ष स्थापन केला आहे. या पक्षात सामील होण्यासाठी प्रमुख अट म्हणजे तुम्ही सुशिक्षित बेकार असला पाहिजे ही आहे.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची गुंडगिरी

समोर येत आहे. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव अनिल नारायण मोरे असे असून, ते महादेवखार येथील रहिवासी आहेत. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेतालगत कांबळे कुटुंबाचीही जमीन आहे. या परिसरात काही मंडळींकडून साकव बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, या साकवामुळे पावसाळ्यात नदीचे पाणी थेट त्यांच्या शेतात शिरून शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती मोरे यांनी व्यक्त केली होती.

यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे जाऊन वस्तुस्थिती मांडली होती. साकव उभारण्यापूर्वी शेताच्या संरक्षणासाठी भिंत बांधणे आवश्यक असल्याची मागणी त्यांनी केली होती. नदीच्या दुसऱ्या बाजूलाही संरक्षण भिंत उभारली नाही तर शेतजमिनींचे मोठे नुकसान होऊ शकते, असे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. दरम्यान, गुरुवारी (दि.२१) दुपारी अनिल मोरे हे आपल्या घरी जात असताना गावातील तुकाराम बाळू कांबळे आणि अस्मिता हरेश मांदाडकर यांनी त्यांना रस्त्यात अडवून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. त्यानंतर दोघांनी मिळून मोरे यांना मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्याचवेळी मंगेश कांबळे हेदेखील घटनास्थळी आले आणि त्यांनीही शिवीगाळ करत ''तक्रार केली तर घरी येऊन मारून टाकू,'' अशी धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर अनिल मोरे यांनी तात्काळ रोहा पोलीस ठाणे गाठून संबंधितांविरोधात तक्रार दाखल केली. मात्र, या प्रकरणात राजकीय दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोपही पुढे येत आहेत.

## ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी?

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँकांकडून सुमारे ६७ टक्के कृषी कर्जवाटप केले जाते, तर राष्ट्रीयकृत बँकांचा वाटा केवळ २६ टक्के आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी कर्जवाटपाचे ८० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफी प्रक्रियेबाबत सर्व बँकांसोबत चर्चा करण्यात आली असून, माहिती कोणत्या स्वरूपात सादर करायची याबाबत नियोजन पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. सरकार वेळेत कर्जमाफी पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, संभाव्य एल निनो आणि कमी पावसाच्या अंदाजाबाबतही मुख्यमंत्र्यांनी चिंता व्यक्त केली. यंदा पावसाचा अंदाज ८८ टक्के असल्याने पिकांवर ताण येण्याची शक्यता आहे. त्यानुसार कृषी विभागाकडून नियोजन सुरू असून जलयुक्त शिवार योजनेच्या कामांना गती देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## वळवलीत जलजीवन योजनेचा बोजवारा

गावात २००३ साली पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली होती. मात्र, गेल्या २३ वर्षांत या योजनेतील पाइपलाइन पूर्णपणे जीर्ण झाली आहे. अनेक ठिकाणी पाइप फुटले असून, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून दुरुस्ती केली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली की, गावातील महिला मंडळाने वर्गणी गोळा करून फुटलेल्या पाइपची दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून २०२३-२४ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली. गावातील तलावात तब्बल १५ फूट खोल खड्डा खोदून विहीर बांधण्यात आली, तर पंपासाठी स्वतंत्र केबीन उभारण्यात आली. घराघरात नळजोडणी मिळणार आणि डोक्यावरचा हंडा उतरणार या आशेने गावातील महिला आनंदी होत्या. मात्र, ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे त्यांच्या आशांवर पाणी फिरल्याचा आरोप माजी सरपंच राजेंद्र चवरकर यांनी केला आहे. योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या पंप केबीनचा स्लॅब कोसळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तसेच कोणतेही योग्य खोदकाम न करता पाइप थेट जमिनीवर टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तलावातील विहीर बांधताना संरक्षण भिंत तोडण्यात आली; मात्र ती पुन्हा बांधण्याचे काम आजतागायत झालेले नाही. या संपूर्ण योजनेसाठी तब्बल ९७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असतानाही तीन वर्षांत गावकऱ्यांच्या घरात पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही, अशी तीव्र खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही योजना अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ठेकेदाराच्या मनमानीबरोबरच पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे महिलांना आजही पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचा आरोप होत आहे. अखेर माजी सरपंच राजेंद्र चवरकर यांनी ग्रामविकास विभाग आणि जिल्हा परिषद अध्यक्षांकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच रखडलेली योजना तातडीने पूर्ण करून ग्रामस्थांना शुद्ध पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

**सीएसआरमधून उभारलेली टाकीही निरुपयोगी**

वळवली गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आदिवासीवाडी परिसरात सीएसआर निधीतून मोठी साठवण टाकी उभारण्यात आली होती. गेल कंपनीच्या माध्यमातून ही टाकी बांधण्यात आल्याची माहिती श्रीकांत भगत यांनी दिली. या टाकीसाठी सुमारे ५८ लाख रुपये खर्च करण्यात आले; मात्र आजही टाकी कोरडीच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. लाखो रुपये खर्च करूनही नागरिकांना पाण्याचा लाभ मिळत नसल्याने प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## अलिबागकरांचे स्वप्न साकार

विकासात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गुरुवारी (दि.२१) या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला रघुजीराजे आंग्रे, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, प्रदीप नाईक, ॲड. प्रवीण ठाकूर, ॲड. निलम हजारे, अनिल चोपडा, सुषमा पाटील, संतोष गुरव, संध्या पालवणकर, ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. ऋषीकेश माळी, आनंद पाटील, ॲड. निवेदिता वाघमारे, समीर ठाकूर, योजना पाटील, सागर भगत, शैला भगत, वृषाली भगत, ॲड. अंकीत बंगेरा, संदीप पालकर, श्वेता पालकर, जमाल सय्यद, वृषाली ठोसर, ॲड. गौतम पाटील, महेश शिंदे, संजना कीर, प्रिया वेलकर, सत्यजीत दळी, मिलिंद चव्हाण यांच्यासह अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे, नगरसेवक, माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अलिबाग शहराच्या मध्यवर्ती भागात सर्वसामान्य नागरिकांसाठी आधुनिक आणि सर्वसमावेशक क्रीडा संकुल उभारण्याचे स्वप्न स्वर्गीय नमिता नाईक यांनी पाहिले होते. लहान मुलांपासून युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना एकाच ठिकाणी विविध क्रीडा आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने या संकुलाची संकल्पना मांडण्यात आली होती. शहराला स्वतःचे सुसज्ज आणि हक्काचे क्रीडा संकुल मिळावे यासाठी नगरपरिषदेकडून विशेष प्रयत्न करण्यात आले.

या प्रकल्पासंदर्भातील ठराव २८ जून २०१६ रोजी नगरपरिषदेत एकमताने मंजूर करण्यात आला आणि श्रीबाग परिसरातील जागा या क्रीडा संकुलासाठी निश्चित करण्यात आली. त्यानंतर १८ जुलै २०१६ रोजी भाऊसाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमीपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. पुढे या क्रीडा संकुलाला स्वर्गीय नमिता नाईक यांचे नाव देण्याचाही ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सुमारे २२ गुंठे जागेवर उभारण्यात आलेले हे भव्य क्रीडा संकुल तळमजला आणि पहिला मजला अशा दोन स्तरांमध्ये विकसित करण्यात आले आहे. तळमजल्यावर अभ्यागत कक्ष, स्विमिंग पूल, कॅरम विभाग आणि बॅडमिंटन कोर्ट उभारण्यात आले आहे. तर, वरच्या मजल्यावर योगा कक्ष, अत्याधुनिक जिम आणि टेबल टेनिससाठी स्वतंत्र विभाग तयार करण्यात आला आहे. याशिवाय स्वतंत्र चेंजिंग रूम, स्वच्छतागृहे आणि इतर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रकल्पासाठी तब्बल ५ कोटी ५४ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असून, वैशिष्ट्यपूर्ण योजना आणि नगरपरिषद निधीतून हे संकुल उभारण्यात आले आहे. याशिवाय आधुनिक जिम साहित्य खरेदीसाठी स्वतंत्रपणे ६९ लाख रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली. या संकुलाचे बांधकाम चेंढरे येथील नागडोंगरी परिसरातील मे. आनंद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांनी पूर्ण केले आहे.

क्रीडा संकुलात वातानुकूलित व्यायामशाळा, अत्याधुनिक व्यायाम साहित्य, स्वच्छता सुविधा आणि दर्जेदार क्रीडा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असलेल्या अलिबागमध्ये अद्ययावत क्रीडा संकुलाची उणीव अनेक वर्षांपासून जाणवत होती. मात्र, आता 'स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल' उभे राहिल्याने अलिबागकरांचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. गुरुवारी सकाळी हे क्रीडा संकुल अधिकृतपणे नागरिकांसाठी खुले करण्यात आले. या संकुलामुळे अलिबाग शहराच्या सौंदर्यात भर पडणार असून, शहरातील युवक आणि क्रीडाप्रेमींना नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच अलिबागमध्ये क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## भीषण अपघातात एकाचा मृत्यू

या अपघातात राजेश जाधव गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर त्यांना तातडीने महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, धडक अत्यंत जोरदार असल्याने उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. राजेश जाधव हे वरंडोली ग्रामपंचायतीमध्ये शिपाई म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अकाली निधनामुळे गावात शोककळा पसरली असून, ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी महाड ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आला असून, महाड पोलीस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## वनवलीत सागाच्या झाडांची कत्तल

कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे महसूल आणि वन विभाग नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या बेकायदेशीर कारभारामुळे परिसरातील पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड आणि भरावामुळे भविष्यात नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढू शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**तोडलेल्या झाडांची लाखोंमध्ये विक्री?**

वनवली परिसरात तोडण्यात आलेल्या सागाच्या झाडांची गुपचूप विक्री झाल्याची धक्कादायक माहितीही पुढे येत आहे. वीसहून अधिक सागाच्या झाडांची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता कत्तल करण्यात आली असून, ही झाडे एका व्यक्तीला सुमारे दीड लाख रुपयांना विकण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. या व्यवहारामागे नेमके कोण आहे आणि वन विभाग याबाबत मौन का बाळगत आहे, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## गांजा विक्रेत्याला बेड्या

आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अनवर जमाल अंसारी (वय २६, रा. जसखार, ता. उरण) असे असून, त्याच्या ताब्यातून ८० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. हिरवट रंगाचा आणि उग्र वास असलेला हा गांजा सुमारे २० हजार रुपये किमतीचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच आरोपीकडून ७ हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईलही हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि श्रीकांत नायडू करीत आहेत. ही कारवाई वपोनि दिपक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, सहायक पोलीस निरीक्षक मनोज गूंड यांनी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

## दिल्ली-मुंबई कॉरिडॉर थेट कळंबोलीपर्यंत

त्यानुसार मोरबे जंक्शन ते आसूडगाव दरम्यान रेल्वे मार्गालगत नवीन काँक्रीट मार्गिका उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

दिल्ली-मुंबई कॉरिडॉरचे मूळ उद्दिष्ट जेएनपीए बंदरातून दिल्लीपर्यंतचा मालवाहतूक आणि प्रवासी प्रवास अधिक वेगवान करणे हे आहे. नव्या मार्गिकेमुळे जेएनपीए बंदराशी थेट संपर्क अधिक सुलभ होणार असून पनवेल परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः मुंब्रा-पनवेल, कल्याण-तळोजा आणि कळंबोली परिसरातील वाहतुकीला पर्यायी मार्ग उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या प्रस्तावित मार्गिकेसाठी मोरबे, आदई, हरिग्राम, केवाळे, खानाव, नेवाळी, पनवेल आणि आसूडगाव या आठ गावांतील काही जमीन प्रकल्पासाठी आवश्यक ठरणार आहे. सध्या संबंधित भूभागाचा प्राथमिक अभ्यास आणि तांत्रिक तपासणी सुरू असून नेमके किती क्षेत्र संपादित होणार याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक) तथा प्रादेशिक अधिकारी अंशुमाळी श्रीवास्तव यांनी सांगितले की, ''मोरबे ते कळंबोली सर्कल या मार्गिकेसाठी डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. आवश्यक भूसंपादनापैकी किमान ९० टक्के प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल. चालू आर्थिक वर्षात प्रकल्प अवार्ड करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.''


### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. कडून व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत असून तो आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर खालील वेळापत्रकानुसार प्रकाशित करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉट्सची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | मडगाव – मंगळुरू सेंट्रल – मडगाव (10107/10108) मेमू ट्रेन तसेच दिवा – सावंतवाडी पॅसेंजर (10105/10106) ट्रेनमध्ये अंतर्गत जाहिरातींचे प्रदर्शन | 02 | 25/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 2 | दिवा – सावंतवाडी पॅसेंजर (10105/10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) या ट्रेनच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन | 03 | 26/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 3 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ महाराष्ट्र राज्यात होर्डिंग्सद्वारे जाहिरात | 07 | 27/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 4 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकल व सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकर बसविणे | 08 | 27/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 5 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 28/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 6 | प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) – मडगाव | 01 | 28/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 7 | एसएलआर लीजिंग – ट्रेन क्र. 11004, 20112, 10104, 22907, 56615-II | 05 | 29/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 8 | आडवली, विलवडे, राजापूर रोड, मूकाम्बिका रोड, पडुबिद्री, बारकूर, काणकोण, कोलाड स्थानकांवर फेअर रिपीटर बसविणे | 08 | 29/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 9 | रेल्वे स्थानकांवर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात, रत्नागिरी, थिविम, करमली, मडगाव, कारवार, सुरतकल, कुन्दापुरा, मुल्की, उडुपी स्थानकांवर होर्डिंग्स तसेच थिवीम येथे व्हिडिओ वॉल | 10 | 30/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 10 | थिविम, करमळी येथील एफओबी वर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात | 02 | 01/06/2026 रोजी 11:00 वाजता |
| 11 | करमळी, थिविम, थिविम-2, कुन्दापुरा, मूकाम्बिका रोड येथे पे अँड यूज शौचालय सुविधा | 05 | 01/06/2026 रोजी 11:00 वाजता |
| 12 | सिंधुदुर्ग, मुर्डेश्वर येथे पे अँड पार्किंग सुविधा | 02 | 01/06/2026 रोजी 11:00 वाजता |
| 13 | करमळी स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे व्यावसायिक जाहिरात | 01 | 02/06/2026 रोजी 11:00 वाजता |
| 14 | मडगाव येथे बाइक पार्किंग | 01 | 02/06/2026 रोजी 11:00 वाजता |

**चौकशीसाठी कृपया संपर्क साधा:** 1. श्री. प्रविण डावरे, मोबाईल क्र. 9004470597, 2. श्री. विनय गावंकर, मोबाईल क्र. 9004476129, 3. श्री. मधुकुमार शेट्टी, मोबाईल क्र. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळास भेट द्या.

**मुख्य वाणिज्य व्यवस्थापक**
**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**



**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/म.प्र. १. दि. १८/१०/२०२३**
**परिशिष्ट- ३**
**(ई- निविदेसाठी जाहिरात नमुना)**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड**
**ई-मेल :-** eerid24@gmail.com **दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७**

### निविदा सूचना क्र १. सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं. ४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु.लक्ष (G.S.T., Insurance & Royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोरबे ल.पा.यो. ता. पनवेल, जि. रायगड या धरणाच्या पुच्छ कालव्यात भराव खचू नये या करिता उर्वरित संरक्षक भिंत बांधणे. | २,४९,९८,९४२/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |
| २. | मोरबे ल.पा.यो.ता. पनवेल, जि. रायगड येथील कालव्याच्या डाव्या तीरावर संरक्षक भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | २,४९,९९,१९८/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |
| ३. | पुनाडे ल. पा. योजना, ता. उरण, जि. रायगड या योजनेचे अधोबाजू व उर्ध्वबाजूकडील अश्मपटल, पोहोच रस्ता, पाईप कंड्युट दुरूस्त करणे आणि संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे | २,४९,९८,३०७/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |
| ४. | राजनाला मध्यम प्रकल्प अंतर्गत डावा मुख्य कालव्यावरील सा. क्र. १५/००० ते १९/००० येथील सेवापथ दुरुस्ती मजबुतीकरण करणे | २,४९,९९,०८०/ | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |

निविदा उपलब्ध कालावधी दि. २२/०५/२०२६ ते दि. २९/०५/२०२६
निविदा उघडण्याचा दि. ०१/०६/२०२६
खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१.संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid24@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**( इंजि. मिलींद पवार )**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

## निवडक



### जनगणेत सहभागी न होण्याचे निवेदन

**म्हसळा :** म्हसळा तालुका कुणबी समाजातर्फे तहसिलदार सचिन खाडे यांना जनगणा प्रक्रियेवर कुणबी समाजाचा असहकार चळवळ मार्फत बहिष्कार असल्याचे पत्र दिले आहे. यावेळी कुणबी समाजाचे अध्यक्ष महादेव भिकू पाटील, सचीव राजाराम तिलटकर, खजिनदार मोहन शिंदे, सह सचिव महेश पवार, पदाधिकारी दिनेश पारावे, दिपेश जाधव, निकेत सावंत आदी उपस्थित होते. यावेळी त्यांनी सांगितले की, या आधी आम्ही ओबीसीसाठी एस.सी, एस.टी. सूची प्रमाणे जनगणनेत स्वतंत्र रकाना नसल्याने तुमच्या मार्फत संपुर्ण राज्यात एक निवेदन दिले होते. परंतु, त्याचा कोणताच परिणाम झालेला नाही. त्यामुळे आम्ही समस्त ७७ गावांतील समाज बांधव या जात निहाय जनगणनेमध्ये सहभागी होणार नाही. याची आपण नोंद घ्यावी, असे सांगण्यात आले.

### पनवेलमधील नाल्यांची साफसफाई




**पनवेल :** पावसाळ्यात नवीन पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. त्यामुळे यंदा महानगरपालिकेकडून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. नवीन पनवेलमधील मुख्य नाल्यांची युद्धपातळीवर साफसफाई सुरू असून, मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ काढण्यात येत आहे. पाण्याचा निचरा सुरळीत राहावा आणि नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. यंत्रसामग्रीच्या सहाय्याने नाल्यातील कचरा व अडथळे हटविण्याचे काम वेगाने सुरू आहे. पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती टाळण्यासाठी पालिकेकडून व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे.

### पत्नीला जाळणाऱ्याला जन्मठेप

**माणगाव :** महाड तालुक्यातील ढालकाठी परिसरातील निशा दिपक झांजे (२८) यांना त्यांच्या पतीने दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी त्यांच्याच राहत्या घरी अंगावर पेट्रोल टाकुन आग लावुन ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी पतीवर गुन्हा दाखल



करण्यात आला होता. दरम्यान, निशा झांजे या मुंबईतील कस्तुरबा हॉस्पीटल येथे उपचार घेत असताना त्यांचा दि.६ जानेवारी, २०२२ रोजी मृत्यू झाला. आरोपी पतीचे नाव दिपक अशोक झांजे (३६) असे असून, त्याच्यावर गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला होता. त्यानंरत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी माणगाव सत्र न्यायालयात पार पडली. या खटल्यामध्ये सहा. सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी सरकार पक्षातर्फे एकूण १५ साक्षीदार तपासले. सर्व बाबींचा विचार करून व उपलब्ध पुराव्यावरून बुधवारी (दि.२०) जिल्हा न्यायाधीश तथा अति. सत्र न्यायाधिश ए०स.टी भालेराव यांनी या प्रकरणात दिपक झांजे यांना दोषी धरून जन्मठेप व दंड रक्कम रूपये ४ हजार न भरल्यास ४ महिने सक्तमजुरी, अशा शिक्षेचा हुकूम मा. न्यायालयाने केला आहे.

### पनवेलमधील शिवमंदिरात चोरीचा प्रयत्न

**पनवेल :** धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पनवेलच्या लाईन आळी परिसरातील एका जुन्या आणि जागृत शिवमंदिरात चोरीचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्याला नागरिकांनी रंगेहात पकडल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेहमीच्या वर्दळीच्या वेळी एका अनोळखी व्यक्तीने मंदिराच्या गर्दीचा गैरफायदा घेत गाभाऱ्यात प्रवेश केला. नंदीच्या मूर्तीजवळ आणि दानपेटीत भाविकांनी अर्पण केलेले पैसे चोरण्याचा प्रयत्न त्याने केला. मात्र, हे कृत्य करत असतानाच सजग भाविकांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी तातडीने चोराला पकडून त्याच्या हालचालींवर नियंत्रण मिळवले. पवित्र स्थळी अशा प्रकारचे कृत्य घडल्याने उपस्थित नागरिकांमध्ये संतापाची भावना दिसून येत होती. देवाच्या दारात चोरीचे धाडस करणाऱ्या या चोरट्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाविकांनी केली आहे.

# 'स्वराज्य'च्या इंटिरिअर कामाला ब्रेक

## १६२ कोटींच्या कामात दिरंगाई; कोकण रेल्वेला पालिकेची कायदेशीर नोटीस

**| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेचे महत्त्वाकांक्षी मुख्यालय असलेल्या 'स्वराज्य' इमारतीच्या अंतर्गत सजावटीच्या कामात मोठी दिरंगाई होत असल्याने पालिकेने कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला कायदेशीर नोटीस बजावली आहे. ठरलेल्या टप्प्यांनुसार कामाचा वेग नसल्याने प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली आहे.




पनवेल नगरपरिषदेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्याने जुनी इमारत अपुरी पडू लागली होती. त्यामुळे महापालिकेने सिडकोकडून तब्बल २८ कोटी रुपये खर्च करून ५ एकर भूखंड विकत घेतला होता. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीसमोरील या जागेवर 'स्वराज्य' मुख्यालयाची उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान, इमारतीतील फर्निचर, इलेक्ट्रिकल व्यवस्था, फाइल सिस्टीम आणि इतर अंतर्गत सजावटीसाठी १६२ कोटी रुपयांचे कंत्राट कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला देण्यात आले होते. मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याची हमी कंपनीने दिली होती. मात्र, प्रत्यक्षात काम सुरू होऊन ६ महिने उलटूनही कामाचा वेग अत्यंत मंद असल्याचे समोर आले आहे.

पनवेल महानरपालिकेने यापूर्वी अंतर्गत नोटीस देत कामाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली होती. तरीही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने अखेर गेल्या आठवड्यात कंपनीला कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. आता या नोटिसीला समाधानकारक उत्तर न दिल्यास अथवा कामात गती न आणल्यास कंपनीचे कंत्राट रद्द करण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### १४० कोटींचा खर्च

'स्वराज्य' या भव्य मुख्यालयाच्या बांधकामासाठी महापालिकेने सुमारे १४० कोटी रुपये खर्च केले आहेत. आता प्रशासनाचा भर अंतर्गत सजावटीची कामे वेगाने पूर्ण करून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे स्थलांतर नव्या वास्तूत करण्यावर आहे. अन्यथा सध्याच्या विविध कार्यालयांच्या देखभालीचा अतिरिक्त आर्थिक भार महापालिकेवर कायम राहणार आहे.

> **"महापालिकेच्या 'स्वराज्य' मुख्यालयातील इंटिरिअरचे काम अपेक्षित गतीने होत नाही. यापूर्वी कंपनीच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. मात्र, सुधारणा न झाल्याने अखेर कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.**
> **– संजय कटेकर, शहर अभियंता, पनवेल महापालिका"**

# मुंबई-गोवा महामार्गावर टोलची लूट



■ **टोलनाक्यावर पत्रकारांचा संताप**

**| पेण | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गाच्या नावाखाली जनतेची अक्षरशः लूट सुरू असून, अपूर्ण रस्त्यावर टोल वसुली करून सरकार आणि प्रशासनाने कोकणवासीयांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे, असा संतप्त आरोप करत रायगड प्रेस क्लबने खारपाडा टोल नाक्यावर जोरदार आंदोलन छेडले होते. रस्ता खड्ड्यांनी भरलेला, सर्विस रोड अधांतरी, गटारांची कामे रखडलेली आणि जीवघेणे अपघात सुरू असताना टोल कसला घेता? असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. यावेळी पत्रकार सरचिटणीस शशिकांत मोरे यांनी टोलविरोधात प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. "जनतेला सुविधा नाहीत, पण वसुली मात्र जोमात", अशी टीका त्यांनी केली. आंदोलनकर्त्यांनी टोलमाफीची मागणी करत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पनवेल कार्यालयातील अधिकारी इंगवले यांना निवेदन दिले. यावेळी त्यांनी महामार्गावरील रखडलेली कामे आणि टोलमाफीचा विषय केंद्र सरकारकडे पाठवण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र, "आश्वासनांचे गाजर नको, पूर्ण महामार्ग हवा", अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी ठामपणे मांडली. या आंदोलनात मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे सचिव अनिल भोळे, जिल्हा प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष अभय आपटे, विजय मोकल, भारत रंजणकर, उपाध्यक्ष संजय मोहिते, मोहन जाधव, प्रशांत शेडगे, संतोष ठाकूर, हरीश बेकावडे, विजय पाटील, चैतन्य पाटील, नंदू जांभुळकर, नंदा म्हात्रे, समीर म्हात्रे, अशोक मोकल यांच्यासह विविध तालुक्यांतील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

# उरणमधील मेडिकल्सचा यशस्वी बंद

**| उरण | प्रतिनिधी |**

ऑनलाइन विक्री होत असलेल्या शेड्युल औषधांविरुद्ध, तसेच तरुण पिढीला सहज डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय उपलब्ध होत असलेल्या नशा येणाऱ्या औषधांच्या, ऑनलाईन सहजुपलब्ध होणाऱ्या अँटिबायोटिक्स औषधांचा अनियमित वापर आणि त्यामुळे होणारे रेजिस्टन्स बाबत जनहितार्थ रुग्णांच्या भल्यासाठी बुधवारी (दि.२०) संपूर्ण भारतभर औषध विक्रेत्यांनी बंद पुकारला गेला होता. त्याला सहयोग म्हणून जिल्ह्याकडून आलेल्या सूचनेनुसार उरण तालुका केमिस्ट्री डिस्ट्रीब्यूशन असो.ने देखील औषध विक्री बंद पुकारला होता.

ऑनलाइन डुप्लिकेट औषध विक्रीच्या संकटासमोर आपला व्यवसाय अबाधित राखण्यासाठी, तसेच सर्व जनतेचा स्वास्थासाठी सभासदांनी एकजुटीने उभे राहिले. यावेळी उरणमधील सर्व १२० मेडिकल या बंद मध्ये सामील झाले होते. त्याचा काही अंशी फटका रुग्णांना बसला. मात्र, ज्या रुग्णांना अत्यावश्यक औषध हवी होती त्यांना औषधे पुरवण्याची व्यवस्था संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी मनोज ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष उमाकांत पानसरे, सचिव राजेश्वर गावंड यांनी या संदर्भात माहिती दिली.




# दिघोडे-चिर्ले अद्याप रखडलेला

## दिघोडे सरपंचांकडून रास्ता रोकोचा इशारा

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील अटल सेतू-चिरनेर या कोकणाकडे जोडणाऱ्या महत्त्वाच्या दिघोडे-चिर्ले या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करोडो रुपयांचा निधी उपलब्ध होऊनही मागील पाच महिन्यांपासून या रस्त्याचे काम रखडले आहे. तरी या रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी काम सुरू न केल्यास जनहितार्थ रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांनी दिला आहे.



दिघोडे-वेश्वी- चिर्ले या गावांतून जाणारा हा महत्त्वाचा रस्ता पुढे अटल सेतू, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीए बंदर तसेच चिरनेर मार्ग, पुणे कोकणातील राज्यमार्गाला जोडला जातो. २०२२-२३ मध्ये आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, निकृष्ट दर्जाचे काम आणि सततच्या अवजड वाहनांच्या रेलचेलीमुळे हा रस्ता अल्पावधीतच खराब झाला होता. खेडोपाडी काँक्रीटचे रस्ते होत असताना तालुक्याला जोडणारा हा मुख्य रस्ता मात्र दयनीय अवस्थेत असल्याने या रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यात यावे यासाठी दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून खड्ड्यात बसून उग्र स्वरूपाचे आंदोलन केले होते.

या आंदोलनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेऊन उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली दिघोडे-चिर्ले रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रीटीकरणासाठी २०२५-२६ मध्ये सुमारे ४५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, असे असतानाही या रस्त्याचे काम रखडल्याने रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर पावसाळ्यात वाहनांना अपघात होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.तरी या रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी सुरू करण्यात यावे यासाठी दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांनी उरण तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग उरण, पोलीस यंत्रणा तसेच संबंधित खात्याकडे पत्रव्यवहार केला आहे. तसेच, काम सुरू न केल्यास जनहितार्थ रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### टँकर चालकाची कारला धडक

**पनवेल :** मद्यपी टँकर चालकाने कारला जोरदार धडक दिल्याची घटना कोन पोलीस चौकीसमोर पनवेल लेनवर घडली. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असून, टँकर चालक अवधेश कुमार रामसंबंध मिश्रा याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाडीवली येथील कृष्णा वाघे हे त्यांच्या कारने सामान खरेदीसाठी नवीन पनवेल येथील डी-मार्टकडे जात होते. दुपारी २.०० वाजताच्या सुमारास कोन पोलीस चौकीसमोरील पनवेल लेनवर ते पोहोचले असता, त्यांच्या मागून भरधाव वेगात येणाऱ्या टँकरने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. या टँकरचा चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचा आरोप वाघे यांच्याकडून करण्यात आला आहे. या धडकेत वाघे यांच्या कारच्या उजव्या बाजूचे मागील दार चेपले गेले. तसेच, मागील उजव्या बाजूचे टायर फुटले असून, इतरही नुकसान झाले आहे.

# जेएनपीए बंदरात कंटेनरचा महापूर



**| उरण | प्रतिनिधी |**

देशातील सर्वात मोठ्या कंटेनर बंदरांपैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) येथे सध्या कंटेनर वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पाच राज्यांतील निवडणुका, उन्हाळी सुट्ट्या आणि वाहनचालकांच्या मोठ्या प्रमाणातील अनुपस्थितीमुळे हजारो कंटेनर बंदर व सीएफएसमध्ये अडकून पडले आहेत. परिणामी आयात-निर्यात व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला असून व्यापारी, निर्यातदार आणि ट्रान्सपोर्ट क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी राज्यांतील हजारो टीटी वाहनचालक निवडणूक व सुट्टीसाठी आपल्या मूळ गावी गेले होते. मात्र, २ महिन्यांनंतरही सुमारे साडेचार हजार चालक अद्याप परतले नसल्याने जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. बंदर आणि कंटेनर फ्रेट स्टेशन दरम्यान कंटेनर ने-आण करण्यासाठी पुरेसे चालक उपलब्ध नसल्याने कंटेनरची प्रचंड कोंडी निर्माण झाली आहे. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती ओसरल्यानंतर बंदरातील कामकाज पुन्हा सुरळीत होण्याची चिन्हे दिसत असतानाच चालकांच्या टंचाईने नवीन संकट उभे केले आहे. मागील १० ते १४ दिवसांपासून कंटेनरची रांग वाढतच असून अनेक कंटेनर वेळेवर हलवता न आल्याने उद्योग क्षेत्राला कोट्यवधी रुपयांचा आर्थिक फटका बसत असल्याचे बोलले जात आहे.

# नेरळ-माथेरान घाट रस्त्याची दुरवस्था

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरानमध्ये येण्यासाठी एकमेव असा नेरळ-माथेरान घाट रस्ता आहे. या घाट रस्त्याची झालेली दुरवस्था यावर बांधकाम विभागाने तत्काळ कार्यवाही करून रस्त्याची सुधारणा केली करावी. अन्यथा दि.१ जून रोजी नेरळ येथील हुतात्मा चौकात रस्ता रोको आंदोलन केले जाईल, असा इशारा नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेने दिला आहे.

नेरळ-माथेरान टॅक्सी चालक-मालक सेवाभावी संस्थेकडून नेरळ-माथेरान घाट रस्त्याच्या अत्यंत दयनीय अवस्थेकडे सर्वांचे लक्ष वेधून घेण्यात आले आहे. माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या घाट रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे पर्यटकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना या घाटात स्वतःची गाडी चालवणे अत्यंत कठीण झाले असून, खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. रस्ते खराब असल्याने वाहनांचे नुकसान मोठ्या प्रमाणात होत असते. खड्ड्यांमुळे स्थानिक टॅक्सी चालकांच्या वाहनांचे देखील अतोनात नुकसान होत असून,



■ **टॅक्सी चालक-मालक संघटना आक्रमक**

■ **दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तसेच, काही दिवसांवर येऊन ठेपलेला पावसाळा आणि सध्याचा सुरू असलेला पर्यटनाचा हंगाम लक्षात घेऊन रस्त्याची सुधारणा करण्याची गरज आहे.

मात्र, नेरळ-माथेरान घाट रस्त्याकडेस्थानिकप्रशासनाचेदुर्लक्ष हो आहे. बांधकाम विभागाकडून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. येत्या काळात पर्यटकांची संख्या वाढणार आहे, जर रस्ता दुरुस्त झाला नाही तर पर्यटनावर त्याचा विपरीत परिणाम होईल. दरम्यान, पुढील १५ दिवसांत नेरळ-माथेरान घाट रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवून रस्ता सुस्थितीत करावा. घाटातील संरक्षक कठड्यांची दुरुस्ती करावी. रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासून कायमस्वरूपी सुरक्षितता निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मान्य झाली नाही तर दि.१ जून रोजी नेरळ-माथेरान घाटात एकही वाहन चालू देणार नाही. तसेच, नेरळ-माथेरान घाट रस्ता येथील हुतात्मा वीर भाई कोतवाल प्रवेश द्वार येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा टॅक्सी चालक-मालक संघटनेकडून देण्यात आला आहे.

## पळस शाळेतून अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले | शिवराम शिंदे यांचे गौरवोद्गार

# कृष्णा ठाकूर यांचा सेवानिवृत्ती सोहळा

**| नागोठणे | महेश पवार |**

पळस माध्यमिक विद्यालय विनाअनुदानित तत्त्वावर चालविताना हायस्कूलचे मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर यांनी केवळ २ हजार रुपयांत काम केले. त्यांनी खूप मेहनत घेऊन शून्यातून ही शाळा उभी केली. शाळा व्यवस्थापन समिती, पळस व कोलेटीचे त्या त्या वेळचे सरपंच तसेच येथील सर्व कार्यकर्त्यांनी ठाकूर यांना वेळोवेळी सहकार्य केले. त्यांनी या शाळेतून अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले.



तसेच, कृष्णा ठाकूर यांचे पळस विद्यालयाला भविष्यातही मार्गदर्शन आणि त्यांना सेवानिवृत्तीच्या काळात निरोगी दीर्घायुष्य मिळावे, अशा शुभेच्छा रोहा पंचायत समितीचे माजी सभापती शिवराम शिंदे यांनी दिल्या.

पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीचे नागोठण्याजवळील पळस येथील माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीच्या सोहळ्याचे आयोजन बुधवारी (दि.२०) करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पेणच्या नगरसेविका सुजाता म्हात्रे, स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन भोईर, माजी अध्यक्ष गणपत डाकी, आ.का. म्हात्रे, किशोर म्हात्रे, जोमा तांबोळी, मारुती शिर्के, हिराजी शिंदे, पळसच्या सरपंच सुप्रिया डाकी, उपसरपंच चंद्रकांत भालेकर, ज्ञानेश्वर शिर्के, नागोठणे केंद्र प्रमुख रुपेश पाटील, पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीचे विक्रांत वार्डे, तेजेश म्हात्रे, दिनेश पाटील, वैशाली पाटील, सायली ठाकूर, विठ्ठल मोरे, पांडुरंग म्हात्रे, लक्ष्मण म्हात्रे, संजय शिंदे आदींसह शाळेतील सर्व शिक्षक, संस्थेच्या इतर शाळांतील शिक्षक, नागरिक, आजी-माजी विद्यार्थी, मित्र परिवार, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याच्या निमित्ताने १०वी परीक्षेत शाळेत पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनी अनन्या शेलार, मंजिरी तांबोळी व तन्वी डाकी यांचा सत्कार करण्यात आला. याच सोहळ्यात मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर यांनी शाळेला साऊंड सिस्टिम भेट स्वरूपात दिली.

दरम्यान, १४ वर्षात शाळेचा निकाल सतत १०० टक्के लावताना ९०० हून अधिक विद्यार्थी या शाळेतून दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. हे सर्व शाळा व्यवस्थापन समिती व माझे सहकारी शिक्षक यांच्यामुळे शक्य झाल्याची भावना यावेळी मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर यांनी आपल्या मनोगत व्यक्त केली.

55 वा स्मृतीदिन



कै. लक्ष्मीबाई नारायण पाटील
यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.
आपल्या बुद्धीमत्तेचा वारसा सर्व नातवंडे पतवंडे पुढे चालवत आहेत.
आपली कृतज्ञ ज्येष्ठ नात
सौ. शैलजा दत्तात्रेय घरत
नागाव उरण

# मेलडीचे राजकारण

कॉलेजातील पोरेपोरी एकमेकांशी दोस्ती किंवा प्रेम व्यक्त करायला चॉकलेटे भेटी देतात. कॅडबरी हे तर त्यासाठी फारच प्रसिध्द आहे. त्या चॉकलेटची एक जाहिरातही त्यावरच आधारलेली आहे. कुछ खास है या टॅगलाईनसह आपण ती पाहिलेली आहे. पण भारतासारख्या देशाच्या पंतप्रधानाने दुसऱ्या देशाच्या एका महिला पंतप्रधानाला चॉकलेटचे पुडके भेट देणे, खुदूखुदू हसत त्याचे फोटो काढणे, आणि राजनैतिक स्तरावर तीच काहीतरी मोठी कामगिरी असल्याप्रमाणे त्यांची चर्चा व तारीफ घडवून आणणे हे सर्व चक्रावून टाकणारे आहे. अशा अनेक भलभलत्या गोष्टी मोदी नेहमी करीत असतात. ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष असताना जेव्हा त्यांची भेट झाली तेव्हा त्यांचा उल्लेख त्यांनी माय फ्रेंड बराक म्हणून केला होता. जेव्हा की, सर्वसाधारणपणे राष्ट्रप्रमुखांच्या पातळीवर अशा प्रकारची अनौपचारिकता दाखवली जात नाही. बराक यांचा हात धरून जोरजोरात हलवणे, त्यांच्या पाठीवर थाप मारणे, नंतरच्या काळात अनेक राष्ट्रप्रमुखांना मिठ्या मारणे हे त्यांचे प्रकार असेच चर्चेचा विषय ठरले होते. कालपरवा युरोपला जाण्यापूर्वी ते अडीच तासासाठी संयुक्त अरब अमिरातीत थांबले होते. तेथील प्रमुखांना भेटण्यासाठी विमानातून उतरल्यानंतर जणू कोणी जुने मित्र आहेत अशा रीतीने हात फैलावून मोदी ज्या रीतीने चालत गेले त्यावर सोशल मिडियात टीका झाली होती. त्याच दरम्यान तिकडे चीनमध्ये शी जिनपिंग यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे अत्यंत संयमाने स्वागत केले होते. साधे हस्तांदोलन व साधे हसणे यापलिकडे त्यात काहीही नव्हते. मोदींचे परदेशी नेत्यांसोबतचे वागणे अनेकांना खटकणारे वाटत आले आहे. मेलोनी यांच्यासोबतच्या त्यांच्या वागण्याने यात भर पडणार आहे. आपले सार्वजनिक आयुष्यही इतके थिल्लर आणि पोरकट झाले आहे मोदींच्या मेलडी देण्याचे वेगवेगळे अर्थ लावले जाऊ लागले आहेत. राहुल गांधी यांनी याबाबत मोदींवर रास्त टीका केली. पण त्याला उत्तर देण्यासाठी वाणिज्यमंत्री पियूष गोयल सरसावले. भारताची परदेशात होणारी चॉकलेटची निर्यात गेल्या दहा वर्षात कशी वाढली आहे याची आकडेवारी त्यांनी दिली. मेलडी हे पार्ले या देशी कंपनीचे चॉकलेट आहे यावरही त्यांनी भर दिला. पण हे दोन्ही दावे हास्यास्पद आहेत.

## थिल्लरपणा

मुळात चॉकलेट हा काही भारताचा पदार्थ नाही. त्यात जो प्रमुख घटक असतो तो कोको. तो दक्षिण अमेरिका किंवा आफ्रिकेत पिकतो. आपण येथे तो आयात करतो. त्यासाठी कोट्यवधींचे डॉलर्स खर्ची टाकतो. त्यानंतर येथे त्यात साखर घालून थोडीफार निर्यात करतो. इतर देशांमध्ये भारतासारखी गोडमिट्ट चॉकलेट्स खाल्ली जात नाहीत. ती कडवट असतात. दुसरे म्हणजे या सर्व प्रकारात भारताच्या पंतप्रधानाने इतक्या थिल्लर पातळीला उतरावे का हा प्रश्न होता. मेलनी आणि मोदी यांची नावे व आडनावे मिळून त्यांचा मेलडी हा शब्द बनवणे व त्यांच्या भेटीचे वर्णन करताना तो वापरणे हे भाजपच्या सोशल मिडियाचे कर्तृत्व आहे. दोन वर्षांपूर्वी हा प्रकार करण्यात आला. मोदींच्या अंधभक्तांची अक्कल ही शाळकरी पोरांइतकीच असते. त्यामुळे त्यांच्या मनोरंजनासाठी तो ठीक होता. पण तो भारताच्या परराष्ट्र खात्याने किंवा स्वतः मोदींनी इतक्या गंभीरपणे घेणे व त्याचा वापर करून आपण फार मोठा पराक्रम केला आहे असे मानणे हा अतर्क्य मूर्खपणा आहे. अर्थात, आताच म्हटल्याप्रमाणे त्यांच्या भक्तांना तो आवडेल. पण या निमित्ताने सर्व जग आपल्याला हसते आहे हे त्यांच्या लक्षात येणार नाही. या निमित्ताने भाजपच्या नेत्यांनी व अंधभक्तांनी पंडित नेहरूंवर केलेली टीका आठवणे अपरिहार्य आहे. १९४७ च्या सत्तांतराच्या वेळी गव्हर्नर जनरल असलेला लॉर्ड माऊंटबॅटन याची पत्नी एडविना व नेहरू यांचे प्रेमसंबंध होते अशा प्रकारची घाणेरडी चर्चा हा परिवार आजवर करीत आला. त्यासाठी नेहरुंचे काही फोटो कायम प्रसारित करण्यात आले. आता मोदींचे मात्र ते कौतुक करत आहेत. तिला मेलडी डिप्लोमसी ठरवत आहेत.

## दु:खावर डागण्या

एकीकडे देशाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे, काटकसर करा, परदेश प्रवास टाळा असे आवाहन करून महामहीम नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले होते. देशाची स्थिती गंभीर आहेच. क्रूड तेलाच्या किमती वाढत चालल्याने आपला परकीय चलनाचे साठे संपत चालले आहेत. पेट्रोल व डिझेलचे भाव दोनदा वाढवण्यात आले असून ते आणखी वाढवावे लागणार आहेत. इतके दिवस त्यांची वाढ रोखून धरण्यात आली होती. येत्या काही दिवसात किमान पाच-सहा वेळा तरी ही वाढ केली जाईल असे अंदाज आहे. मोदींनी २०१४ मध्ये सत्ता हाती घेतली तेव्हा देशाची क्रूड तेलाची आयात ७७ टक्के होती. ती आता ९० टक्क्यांवर गेली आहे. हे का घडले याचे स्पष्टीकरण सरकार देत नाही. २०१५ नंतर क्रूड तेलाच्या किमतीत घसरण झाली. कोरोनाच्या काळात तर या किमती ४० डॉलर प्रतिबॅरलपर्यंत खाली आल्या होत्या. तरीही मोदी सरकारने देशातील पेट्रोल व डिझेलच्या किमती घटवल्या नाहीत. याच काळात घरगुती गॅसच्या किमतींवर दिली जाणारी सबसिडी हळूच काढून टाकण्यात आली. यातून तेल कंपन्यांना प्रचंड नफे झाले. त्यावेळी जनतेला कोणताही लाभ मिळू दिला गेला नाही. आता इराण युध्दानंतर क्रूड तेलाच्या किंमती शंभर डॉलर प्रतिबॅरलच्या वर गेल्यावर मात्र मोदींच्या सरकारला जनतेची आठवण आली. जनतेला त्यागाची आवाहने ते करू लागले. लोकांनी तेल कमी वापरावे, मेट्रो किंवा सार्वजनिक बसने प्रवास करावा असे ते सांगतात. पण मुंबईतली बेस्ट, पुण्याची पीएमटी किंवा महाराष्ट्रातली एसटी यांची हालत या सरकारने काय करून ठेवली आहे याचे उदाहरण सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. सरसकट अनेक सेवा कमी झाल्या आहेत. बसेस नियमित नाहीत. भाडी प्रचंड वाढली आहेत. वेळा सोईच्या नाहीत. त्यामुळे लोक नाईलाजाने खासगी वाहनांकडे वळले आहेत. आता एकाएकी ही स्थिती सुधारणे अशक्य आहे. सोन्याची आयात सामान्य माणसाच्या खरेदीसाठी होत नाही. सामान्य माणूस परदेश प्रवासाची सोडाच गावातून उठून मुंबईत वारंवार जाण्याची चैन करू शकत नाही. अशा स्थितीत त्याला परकीय चलनाची बचत करण्याचे आवाहन करणे म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखे होते. अशा आवाहनांमुळे येत्या काळात आणखी कोणते संकट ओढवणार आहे याची चिंता सध्या सामान्य माणसाला भिववत आहे. एकीकडे देशात भरपूर पेट्रोल असल्याचे मुख्यमंत्री वगैरे सांगत असताना गावोगावचे पेट्रोल पंप बंद आहेत. ग्राहकांना परत पाठवत आहेत. किंवा तेथे मोठ्या रांगा लागलेल्या दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर मोदींनी तिकडे चॉकलेटे वाटणे आणि त्याला मोठा मास्टरस्ट्रोक म्हणणे हे दु:खावर डागण्या देण्यासारखे आहे.

---

**। विचार**

# आवाहन भावनिक, गणित वास्तववादी

***युद्धजन्य परिस्थिती, इंधन दरवाढ, रुपयाचे सतत घसरणे या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आणि सोने-चांदीची खरेदी टाळण्याचे आवाहन केले. यातून आर्थिक शिस्त, राष्ट्रीय जबाबदारी आणि 'राष्ट्र प्रथम' या विचारसरणीचा संगम दिसून येत असला तरी विषयाला दुसरी बाजूही आहे. सत्ताधारी तसेच विरोधकांनी चर्चेत आणलेल्या यामागील भूमिकांचा मागोवा.***




भारत हा जगातील सर्वाधिक कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. देशाच्या ऊर्जा गरजांपैकी मोठा हिस्सा परदेशातून आयात केला जातो. कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली, की महागाईवर, वाहतूक खर्चावर आणि उद्योगांच्या उत्पादन खर्चावर त्याचा थेट परिणाम होतो. त्याच वेळी, भारत हा जगातील सर्वात मोठा सोने आयातदार देश आहे. भारतीय समाजात सोने ही केवळ चैनीची वस्तू नाही, तर परंपरा, प्रतिष्ठा आणि सुरक्षित गुंतवणुकीचे प्रतीक आहे. त्यामुळे दरवर्षी अब्जावधी डॉलरचे सोने देशात आयात होते आणि परकीय चलनसाठ्यावर मोठा ताण निर्माण होतो. चालू आर्थिक वर्षात सोन्याची आयात सुमारे ७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचल्याचे अंदाज व्यक्त केले जात आहेत, तर कच्च्या तेलाच्या किंमती प्रति पिंप १०७ डॉलरच्या पुढे गेल्याने आयात खर्च झपाट्याने वाढला आहे. अशा परिस्थितीत सरकारसमोर दोनच पर्याय असतात. एक तर आयात बिल आणि आर्थिक तूट वाढू द्यायची किंवा नागरिकांना संयम आणि बचतीचे आवाहन करून आर्थिक दबाव कमी करण्याचा प्रयत्न करायचा. पंतप्रधान मोदी यांनी अलिकडेच दुसरा मार्ग निवडला. त्यातूनच गेल्या काही दिवसांमध्ये देशात जोरदार मतमतांतरे पहायला मिळाली.

बाजारातील तज्ज्ञ अशा प्रतिक्रियेला 'नी-जर्क रिॲक्शन' मानतात. त्यांच्या मते, भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन सोन्याशी इतके घट्ट जोडलेले आहे, की सोनेखरेदी वर्षभर पूर्णपणे थांबवणे व्यवहार्य नाही. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि ग्रामीण भागातील बचतीची पद्धत यामुळे सोन्याची मागणी पूर्णपणे कोसळणार नाही; मात्र अल्पकालीन अस्थिरता निश्चितच वाढू शकते. सोने ही भारतीयांसाठी सुरक्षित गुंतवणूक आहे. शेअर बाजारातील चढ-उतार किंवा बँकिंग व्यवस्थेवरील अविश्वासाच्या काळात लोक सोन्याकडे स्थैर्य म्हणून पाहतात. सोन्यावर निर्बंध लादल्यास किंवा आयात शुल्क वाढवल्यानंतर चोरटी आयात वाढल्याचे अनुभव भारतात आहेत. अधिकृत आयात कमी झाली तर काळ्या बाजाराला चालना मिळू शकते, अशी भीती काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सरकारने पुढे धोरणात्मक निर्बंधांचा विचार केल्याचे अनपेक्षित दुष्परिणामही लक्षात घ्यावे लागतील. इंधन वापर कमी करण्याच्या आवाहनानेही अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. सार्वजनिक वाहतूक वापरणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे आणि अनावश्यक प्रवास टाळणे हे उपाय ऊर्जाबचतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. कोविड काळात भारताने या पद्धतींचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे इंधन बचतीचा संदेश हा पूर्णपणे अवास्तव नाही; मात्र याच मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी हे सरकारच्या आर्थिक अपयशाचे लक्षण असल्याचे म्हटले. 'दहा वर्षे सत्तेत राहिल्यानंतरही ऊर्जा स्वावलंबन का साधता आले नाही?' असा प्रश्न विरोधक विचारत आहेत.

**भागा वरखड**

विरोधकांच्या मते नागरिकांना काटकसरीचे सल्ले देण्यापेक्षा सरकारने महागाई नियंत्रणात आणणे, सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करणे आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांमध्ये गुंतवणूक वाढवणे अधिक आवश्यक आहे. दुसऱ्या बाजुने पाहता लक्षात येते की, सत्ताधारी पक्ष या आवाहनाला 'आर्थिक राष्ट्रभक्ती'चे स्वरूप देत आहे. कोरोनाकाळात जनतेने पाळली, तशीच आर्थिक शिस्त पाळणे ही संकटाच्या काळातही सामूहिक जबाबदारीची जाणीव ठरते, असे भाजपचे मत आहे. 'देश अडचणीत असताना नागरिकांनीही काही प्रमाणात त्याग करणे आवश्यक असते,' असा संदेश सत्ताधारी पक्ष देत आहे. या संपूर्ण वादात एक महत्त्वाचा आर्थिक पैलू दुर्लक्षित करून चालणार नाही. तो म्हणजे चालू खात्यातील तूट. भारत जितकी जास्त आयात करतो आणि जितकी कमी निर्यात करतो, तितका डॉलरवरील दबाव वाढतो. सोने आणि तेल या दोन्ही वस्तूंची आयात कमी झाल्यास देशाची व्यापारी तूट कमी होऊ शकते. रुपयाला काही प्रमाणात स्थैर्य मिळू शकते आणि परकीय चलन साठ्यावरचा दबाव कमी होऊ शकतो. याचा दुसरा सकारात्मक परिणाम म्हणजे पर्यायी गुंतवणूक वाढण्याची शक्यता. नागरिकांनी भौतिक सोने खरेदी कमी करून सोव्हरिन गोल्ड बाँड, म्युच्युअल फंड किंवा शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास हा पैसा अर्थव्यवस्थेच्या उत्पादक क्षेत्रात वापरला जाऊ शकतो. म्हणजेच, मृत गुंतवणुकीऐवजी उत्पादनक्षम गुंतवणूक वाढण्यास मदत होऊ शकते. तथापि, सरकारसमोर खरी कसोटी आहे ती संतुलन राखण्याची.

आर्थिक शिस्त आणि आर्थिक मंदी यांच्यातील रेषा अत्यंत पातळ असते. मोदी यांनी देशवासीयांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आणि शक्य असल्यास एक वर्ष सोने-चांदी आयात टाळण्याचे केलेले आवाहन हे केवळ आर्थिक सूचनांपुरते मर्यादित नाही. त्यामागे भारताच्या वाढत्या आयात खर्चाची चिंता, परकीय चलनावरील दबाव, जागतिक अस्थिरता आणि आत्मनिर्भरतेचा संदेश दडला आहे; मात्र अशा प्रकारच्या आवाहनांचा परिणाम केवळ जनमानसावर होत नाही, तर त्याचे पडसाद शेअर बाजार, सराफा बाजार, उद्योगक्षेत्र, रोजगार आणि राजकीय वातावरणातही उमटतात. त्यामुळे या आवाहनाकडे भावनिक किंवा राजकीय चष्म्यातून नव्हे, तर व्यापक आर्थिक वास्तवाच्या दृष्टिकोनातून पहायला हवे. भारत सर्वाधिक इंधन आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. कच्च्या तेलासाठी देशाला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करावे लागते. जागतिक बाजारात तेलाच्या किंमती वाढल्या की महागाई, वाहतूक खर्च आणि उत्पादन खर्चावर थेट परिणाम होतो. दुसरीकडे, भारत हा जगातील सर्वात मोठा सोने आयात करणारा देश म्हणूनही ओळखला जातो. भारतीय समाजात सोने हे केवळ दागिने किंवा गुंतवणूक नसून परंपरा, प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेचे प्रतीक मानले जाते. विवाह समारंभ, सण आणि बचतीची मानसिकता यामुळे दरवर्षी प्रचंड प्रमाणात सोने-चांदी आयात केली जाते. परिणामी, देशाच्या व्यापारतुटीवर दबाव वाढतो. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी केलेले आवाहन महत्त्वाचे ठरते. इंधन बचतीमुळे आयात बिल कमी होऊ शकते, तर सोने-चांदी आयात घटल्यास परकीय चलनाचा ताण कमी होण्यास मदत होऊ शकते.

संपूर्ण प्रकरणामध्ये सरकारचा मूलभूत युक्तिवाद असा आहे, की अनावश्यक आयात कमी झाली, तर देशांतर्गत उत्पादन, बचत आणि गुंतवणुकीला चालना मिळेल. आर्थिक दृष्टिकोनातून पाहता हा विचार पूर्णपणे चुकीचा नाही; परंतु प्रश्न असा आहे, की अशा भावनिक आणि नैतिक आवाहनांमुळे प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो? या विधानानंतर सर्वप्रथम प्रतिक्रिया उमटली ती शेअर बाजारात. वाहन उद्योग, तेल विपणन कंपन्या, विमान वाहतूक आणि पेट्रोकेमिकल क्षेत्रातील समभागांमध्ये काही प्रमाणात अस्थिरता दिसून आली. गुंतवणूकदारांना भीती वाटू लागली, की इंधन वापरात घट झाली तर संबंधित उद्योगांच्या मागणीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, इलेक्ट्रिक वाहन, अक्षय ऊर्जा आणि सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांकडे सकारात्मक नजरेने पाहिले जाऊ लागले. म्हणजेच, बाजाराने या आवाहनाला केवळ तात्पुरती प्रतिक्रिया न मानता भविष्यातील धोरणात्मक संकेत म्हणूनही घेतले. सराफा बाजारावर त्याचा अधिक थेट परिणाम दिसून आला. सोने-चांदी आयात कमी करण्याच्या सूचनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. काही दिवस बाजारात खरेदी मंदावली. ग्राहकांनी किंमती आणखी वाढतील का किंवा सरकार पुढील काळात निर्बंध आणेल का अशा शक्यतांचा विचार सुरू केला. परिणामी, किरकोळ बाजारातील व्यवहारांवर परिणाम झाला. विशेषतः छोटे ज्वेलर्स आणि कारागीर वर्ग चिंतेत पडला. भारतातील लाखो लोकांचे रोजगार या उद्योगावर अवलंबून आहेत. त्यांचे व्यवसाय यामुळे बाधित होऊ शकतात. त्यामुळे 'आयात टाळा' हा संदेश एका मोठ्या अर्थसाखळीवर परिणाम करणारा ठरू शकतो.

---

**। चर्चा आजची**

# आजही महिला असुरक्षित

देशात जेव्हा जेव्हा एखादी महिला, मुलगी किंवा मुलावर अत्याचाराची कोणतीही भीषण घटना समोर येते तेव्हा समाज अचानक अस्वस्थ झालेला दिसून येतो. वृत्तवाहिन्यांवर गरमागरम वादविवाद सुरू होतात, सोशल मीडियावर संतापाचा उद्रेक होतो, राजकीय पक्षांनी विधाने केली, रस्त्यावर मेणबत्त्या पेटवल्या जातात आणि काही दिवसांपासून संपूर्ण देशच महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर झाल्यासारखे वाटते, पण जसजसा वेळ जातो तसा तोच समाज पुन्हा सामान्य होतो. प्रश्न असा आहे की, प्रत्येक मोठ्या घटनेनंतर आपला राग क्षणभंगुर ठरतो, तर समस्या कायम का राहतात? खरं तर, आम्ही बऱ्याच काळापासून महिलांवरील हिंसाचार केवळ कायदा आणि गुन्हेगारीच्या कक्षेत मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, तर ही समस्या खूप खोल आणि गुंतागुंतीची आहे. ज्या समस्येचा अंत लावणे कठीण होऊन बसले आहे. आपल्या घरातच आज महैला असुरक्षित आहे असे अनेकदा आपण अनुभवले आहे. हि विकृती संपणार कधी असा सवाल समाजासमोर आहे. पत्रकारिता क्षेत्रात येण्यापूर्वी सामाजिक संस्थांसोबत काम करण्याची संधी मिळाली होती. या सामाजिक संथांमहदये काम करताना महिला आणि मुलींचे दु:ख जवळून पाहण्याची संधी मिळाली. न्याय मागणीसाठी येणाऱ्या महिला आणि त्यांची व्यथा ऐकली कि असे वाटे काय हा समाज आहे. सामाजिक भान आणि रक्ताचे नाते विसरून गेला आहे. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारापेक्षासमाजातील टोमणे त्यांना असह्य वेदना देऊन वाजणारे असतात. हे प्रत्यक्ष अनुभवण्याचा योग्य अनेकदा आला आहे. त्यांच्यावर झालेल्या अत्याचारापेक्षा समाजाची प्रतिक्रिया त्या महिलांना जगणे कठीण करून सोडतातत. विशेषत: ज्या स्त्रिया आपल्यावरील अत्याचाराविरुद्ध पोलिस, न्यायालय किंवा कायद्याचा सहारा घेण्याचे धाडस करतात, त्या अनेकदा त्यांच्या कुटुंबात आणि सामाजिक वर्तुळात एकट्या पडतात. हे कोणी ज्योतिषाने सांगण्याची गरज नाही. आजच्या वैज्ञानिक युगात अनेक स्त्रिया लहान मुलांसह आर्थिक असुरक्षिततेमध्ये संघर्ष करत आहेत. त्यांच्यापुढे केवळ न्यायाचा लढा नव्हता, तर जगण्याचाही लढा होता. अशी अनेक प्रकरणेही उघडकीस आली, ज्यात सुनेने सासरच्यांविरुद्ध तक्रार केल्यानंतर किंवा पोलिसांना बोलावल्यानंतर सासरच्या लोकांनी महिलेला आणि तिच्या मुलांना घराबाहेर हाकलून दिले. त्याला कायद्याशी लढण्याचा सल्ला देऊन त्याला सुरुवातीच्या टप्प्यात पाठिंबा आणि धीर देणाऱ्या अनेक संस्था, मित्र किंवा नातेवाइकांनीही त्याला एकटे सोडून माघार घेतल्याची अत्यंत दु:खद परिस्थिती दिसून आली. अशा परिस्थितीत त्या महिलेने जायचे कुठे? त्या महिलेनेन्यायासाठी कोणता दरवाजा ठोठावावाम्हणजे तिचे जगणे सुंदर होऊन जाईल हा एक गंभीर प्रश्न ज्याचे उत्तर अद्याप सापडलेले नाही. हा प्रश्न केवळ एका कुटुंबाचा नसून संपूर्ण समाजरचनेचा आहे. न्याय मागणाऱ्या स्त्रीला तिचे घर, सामाजिक आधार आणि भावनिक आधार गमवावा लागला, तर केवळ कायदेशीर तरतुदींमुळे तिचे जीवन सुरक्षित होऊ शकत नाही.

**सुयोग आंग्रे**

याहूनही मोठा प्रश्न असा आहे की आजही आपल्या समाजात न्याय मागणाऱ्या महिलांनाच गोत्यात का उभे केले जाते? कायद्याचा अवलंब करणे हे अजूनही सामाजिक विद्रोह मानले जाते का? यामुळेच अनेक महिला अन्याय सहन करूनही तक्रार करण्यास घाबरतात. निर्भया प्रकरणानंतर कायद्यात अनेक बदल झाले. कठोर शिक्षेची तरतूद वाढली, जलदगती न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली, महिला हेल्पलाइन आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याच्या घोषणा करण्यात आल्या. पण कायदे बदलून समाज बदलतो का? असे झाले असते, तर आजही बाहेर गेलेली आपली मुलगी सुखरूप परत येईल की नाही, अशी भीती पालकांच्या मनात नसती. यामागची समस्या ही आहे की आपण अजूनही महिलांच्या सुरक्षेला महिलांचा प्रश्न मानतो, तर हा संपूर्ण सभ्यतेचा प्रश्न आहे. ज्या समाजात मुलीचे कपडे, तिची हालचाल, तिच्या मैत्रिणी, तिची बोलण्याची पद्धत आणि तिच्या हसण्यावरही नजर ठेवली जाते, तिथे हिंसा आता केवळ आनुषंगिक घटना राहिलेली नाही. तिकडे सामाजिक वातावरणही गुन्ह्याला वैधता देऊ लागते. ही परिस्थिती कधीकधी खेडे आणि शहरांमध्ये अधिक जटिल दिसते. तिथे स्त्रीला कुटुंबाच्या प्रतिष्ठेशी जोडले जाते, पण तिच्या इच्छा, स्वातंत्र्य आणि अधिकारांना तितक्या गांभीर्याने स्वीकारले जात नाही. आधुनिकतेचा बाह्यविस्तार शहरांमध्ये नक्कीच दिसतो, पण मानसिकतेच्या पातळीवर पुरुषसत्ताक विचार अजूनही खोलवर रुजलेला आहे. डिजिटल माध्यमांनी या संकटाला नवा आयाम दिला आहे. सोशल मीडियावर महिलांबद्दल असभ्य कमेंट्स, ट्रोलिंग आणि चारित्र्यहनन या गोष्टी आता सर्रास होत आहेत.

हा देखील एक प्रकारचा हिंसाचारच आहे, पण समाजातील एक घटक याला मनोरंजन म्हणून घेऊ लागला आहे, हे दुर्दैव आहे. हे आपल्या सामूहिक संवेदना नष्ट होण्याचे लक्षण आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ पोलीस, न्यायालये आणि शिक्षा एवढाच मर्यादित राहू शकत नाही. हा देखील शिक्षण, कौटुंबिक, सामाजिक व्यवहार आणि सांस्कृतिक जाणिवेशी संबंधित प्रश्न आहे. लहान मूल आपल्या घरातील महिलांकडे पाहत असलेली वागणूक त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनते. त्यामुळे महिलांच्या सन्मानाची सुरुवात घरापासून आणि शाळेपासून व्हायला हवी. कायद्याचा आधार घेणाऱ्या स्त्रीला समाजाने एकटे सोडू नये, हेही महत्त्वाचे आहे. जर आपल्याला खरोखरच आधुनिक आणि संवेदनशील राष्ट्र घडवायचे असेल तर आपल्याला आपल्या मुलींना केवळ सुरक्षिततेचे आश्वासनच नाही तर निर्भय जीवनाचे आश्वासनही द्यावे लागेल.

---

**लोकसंसद**

## नालेसफाईत सातत्य आणि बेशिस्तांवर कारवाई गरजेची




मुंबईतील नालेसफाईदरम्यान नाल्यांतून रिक्षाचे सांगाडा, फ्रिज, सोफा, प्लास्टिक पिशव्या, घरगुती कचरा, लाकडी सामान, तसेच इतर मोठमोठ्या वस्तू काढल्याची बातमी वाचनात आली. ही बाब केवळ धक्कादायक नसून शहरातील काही नागरिकांच्या बेजबाबदार आणि बेशिस्त वर्तनाचे गंभीर उदाहरण आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिका प्रशासनाकडून नालेसफाई मोहीम राबवली जाते. मात्र काही लोक घरगुती कचरा, भंगार साहित्य आणि मोठ्या वस्तू थेट नाल्यांत टाकत असल्याने नाले तुंबण्याची समस्या अधिक गंभीर बनते. परिणामी मुसळधार पावसात रस्त्यांवर पाणी साचते, वाहतूक विस्कळीत होते आणि सामान्य नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. नालेसफाई ही केवळ पावसाळ्यापूर्वीची औपचारिक मोहीम न राहता वर्षभर सातत्याने होणे आवश्यक आहे. नियमित स्वच्छता आणि देखरेख झाल्यास नाल्यांत एवढ्या मोठ्या प्रमाणात कचरा साचणार नाही. त्याचबरोबर नाल्यांत कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कठोर दंडात्मक कारवाई करणेही तितकेच गरजेचे आहे. मुंबईची तुंबई न होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक या दोघांनीही आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

**। दिनविशेष**

# कॉम्रेड श्रीपाद डांगे : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे भिष्माचार्य.

कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचा जन्म १० ऑक्टोबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील नाशिक ज़िल्ह्यामधील करंजगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अमृत डांगे हे होते. तर कॉम्रेड डांगे यांच्या पत्नीचे नाव उषाताई श्रीपाद डांगे हे होते. कॉम्रेड डांगे यांचे सुरुवातीचे शिक्षण नाशिक मध्येच झाले. पुढील शिक्षण त्यांनी मुंबई मधील विल्सन महाविद्यालयात घेतले. महाविद्यालयिन शिक्षण घेत असतानाच त्यांनी असहकार चळवळी मध्ये सहभाग घेतला. भारतात ब्रिटिश राज्यवट सत्तेवर होती. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात त्यांनी कामगार चळवळ उभी केल्याने त्यांच्यावर कानपुर कट आणि मिरत कट खटले चालविले गेले. त्यांना



१३ वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागला. कॉम्रेड डांगे यांच्यावर राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांचा प्रभाव होता. परंतु नंतरच्या काळात ते साम्यवादी विचारसरणी कडे वळले. त्यांनी म सोशालिस्ट म हे भारत देशातील पहिले साम्यवादी वृत्तपत्र सुरु केले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही त्यांची आग्रही भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कॉम्रेड डांगे यांनी दिलेले योगदान हे खूप मोठे आहे. कॉम्रेड डांगे हे उत्तम वक्ते होते. त्यांच्या भाषणाची सुरुवात खूप शांत आणि सौम्य असायची, पण भाषणाच्या शेवटी ते अतिशय आक्रमकपणे आपली भूमिका मांडायचे.

कॉमेड डांगे हे भारतीय कॅम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी आपले सर्व आयुष्य कष्टकरी, कामगार वर्गाच्या हक्कासाठी घालविले. कॉम्रेड डांगे हे भारतातील ट्रेड युनियनचे प्रमुख होते. १९२६-२७ मध्ये मुंबई मध्ये जी कामगार चळवळ उभी राहिली, त्याचे सर्व श्रेय कॉम्रेड डांगे यांनाच जाते. १९४६ मध्ये ते मुंबई विधानसभेवर निवडून गेले होते. १९५७ आणि १९६७ मध्ये कॉम्रेड डांगे हे मुंबई मधील दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले होते. लोकसभेत त्यांनी आक्रमकपणे जनतेचे प्रश्न मांडले. लोकसभेतील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणामुळे लोकसभेत ते एक उत्तम संसदरत्न म्हणून प्रसिद्ध होते. २२ मे १९९१ रोजी या जेष्ठ लोकसभा सदस्याने, जेष्ठ कामगार नेत्याने जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जाण्यामुळे कामगार चळवळीची, भारतीय कॅम्युनिस्ट पक्षाची खूप मोठी हानी झाली. साम्यवादाच्या प्रसाराच्या त्यांच्या कार्याबद्दल सोव्हीयत युनियने कॉम्रेड डांगे यांना सर्वोच्च असा 'लेनिन पदक' देवून सन्मान केला. कॉम्रेड श्रीपाद डांगे यांची मुलगी रोझा देशपांडे यांनी एस. ए. डांगे : एक इतिहास नावाचे पुस्तकाची निर्मिती केली. तसेच त्यांचा जावई विद्याधर देशपांडे व त्यांची मुलगी रोझा देशपांडे या दोघांनी मिळून 'कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे विविध विचार संग्रह' या पुस्तकाची निर्मिती केली. तसेच लेखक डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे' नावाच्या पुस्तकाची निर्मिती केली. अशा या थोर स्वातंत्र्यसैनिकाला, कामगार नेत्यांला आज स्मृतिदिना निमित्ताने लाल सलाम.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ मे

१)श्री.गजानन तुकाराम लखमदे वरसोली, अलिबाग, २२-५-१९५२

२) श्रीम.अंजली संतोष वाकडे नागडोंगरी,अलिबाग, २२-५-१९६६

३)श्रीम.सीमा प्रकाश पाटील चेंढरे नागडोंगरी, अलिबाग दि.२२-५-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. पार्वती महादेव माळी, स्मरणार्थ अलिबाग**

# शेतकऱ्यांना मोबदल्याची प्रतीक्षा

## ● प्रकल्पबाधित आर्थिक अडचणीत; डीएफसीसी कार्यालयाचा बेजबाबदार कारभार

**| पालघर | प्रतिनिधी |**

मुंबई-दिल्ली अतिजलद रेल्वे मालवाहू (डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर) प्रकल्पाचे काम जवळपास पूर्ण झाले असले तरी या प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांना अद्याप मोबदला देण्यात आला नाही. पालघर जिल्ह्यातील शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून हा मोबदला मिळवण्यासाठी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशनकडे (डीएफसीसी) पाठपुरावा करीत असले तरी त्यांना उडवाडवीची उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा पालघर जिल्ह्यातून जात असून सद्यस्थितीला या प्रकल्पाचे काम पूर्णत्वाला आले आहे. त्यानंतरही या प्रकल्पामध्ये जमीन संपादित करण्यात आलेल्या सुमारे ६० खातेदारांना अद्याप भूसंपादनाचा मोबदला मिळालेला नाही. या खातेदारांचे एक ते दीड कोटी रुपयांपर्यंतचे मोबदले गेल्या तीन ते चार महिन्यांपासून रखडले आहेत. डीएफसीसी कार्यालयाच्या बेजबाबदार कारभारामुळे बाधित शेतकरी आदिवासी, बिगर आदिवासी, बागायतदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. केंद्र सरकारने मालवाहतूक अधिक वेगवान आणि आधुनिक करण्यासाठी हा प्रकल्प हाती घेतला असला तरी प्रत्यक्षात जमिनी गमावलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याचा आरोप होत आहे. अनेक खातेदारांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मोबदल्याची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



### आंदोलनाचा इशारा

**शेतकऱ्यांना वेळेत मोबदला मिळत नसेल तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. प्रकल्पासाठी वेगाने कामे सुरू असताना बाधितांना मात्र न्याय दिला जात नाही. डीएफसीसी प्रशासनाकडे तातडीने हा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.**

जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आवश्यक कागदपत्रे, सातबारा उतारे, वारस नोंदी आणि बँक तपशील या प्रकल्पाच्या सक्षम प्राधिकारी प्रशासनाकडे सादर करण्यात आले आहेत. परिपूर्ण असलेल्या या फायली डीएफसीसीच्या वित्त विभागात फिरत असून अंतिम मंजुरीच्या नावाखाली मोबदला अडकवून ठेवण्यात येत आहे. विशेष म्हणजे अनेक शेतकऱ्यांनी मोबदल्याच्या अपेक्षेवर कर्जफेड, घरबांधणी, शेती विकास तसेच मुलांच्या शिक्षणाचे नियोजन केले होते, त्यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे.

> **संबंधित प्रकरणे आमच्या स्तरावरून डीएफसीसीच्या वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठवली आहेत. त्यांनी या प्रकरणांना मंजुरी देऊन पैसे वितरण करणे आवश्यक आहे.**
> **– महेश सागर, डीएफसीसी प्रकल्प अधिकारी**

# विना अनुदानित खतांची विक्री बंद

## नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्यात काही खत उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांकडून अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विना अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) केली जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत संबंधित प्रकाराला तात्काळ बंदी घालण्याचे आदेश जारी केले असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



भारत सरकारच्या रसायने व खते मंत्रालयाच्या खत विभागानेही खतांसोबत इतर उत्पादनांचे ‘टॅगिंग’ करणे हे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने आता अनुदानित खतांचा पुरवठा करताना इतर कोणत्याही उत्पादनांची सक्ती करण्यास मनाई केली आहे.

शासन निर्णयानुसार, राज्यातील अनुदानित खतांचे उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांना त्यांच्या परवान्यात नमूद असलेल्या अनुदानित रासायनिक खतांव्यतिरिक्त इतर विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके यांचा पुरवठा व विक्री करता येणार नाही. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच, कोणतीही कंपनी किंवा विक्रेता टॅगिंग अथवा लिंकिंग करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

कृषी मंत्री भरणे पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांना आवश्यक असलेले अनुदानित खत सहज आणि योग्य दरात मिळणे हा त्यांचा हक्क आहे. खतांसोबत इतर उत्पादनांची सक्तीची विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर शासन कठोर कारवाई करेल.

## १६ हजार रूपयांची चोरी

**पनवेल :** चोरट्यांनी रेस्टॉरंट तसेच दूध डेअरी आणि पान शॉपचे लोखंडी शटर उचकटून तेथून मद्य, सिगारेटची पाकिटे आणि रोख रक्कम असा एकूण १६ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल चोरल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास पद्मा बार अँड रेस्टॉरंट नवीन पनवेल येथून चोरट्यांनी रोख रक्कम, मोबाईल आणि मद्याच्या बाटल्या चोरून नेल्या. तर, सरिता दूध डेअरीमधून त्यांनी ५०० रुपयांची चिल्लर आणि खुशी पान शॉपमधून रोख रक्कम आणि सिगारेटची पाकिटे चोरून नेली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## रमेश पाटील यांचे निधन

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील भाकरवड येथील रहिवासी रमेश विष्णू पाटील यांचे ६२ व्या वर्षी मंगळवारी दि.१९ मे २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. रमेश पाटील हे सर्वांच्या सुखदुःखात सक्रिय सहभाग घेत असत. त्यांच्या निधनाची बातमी कळतात संपूर्ण भाकरवड परिसरावर शोकांतिका पसरली. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी विविध शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, अध्यात्मिक क्षेत्रातील नामवंत मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण, जावई, नात असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवार दि. २८ मे रोजी ओंकारेश्वर मंदिर दिवलांग येथे तर तेरावे रविवार दि.३१ मे रोजी राहत्या घरी होणार आहे.



# वृद्धाची लाखोंची फसवणूक

**| पालघर | प्रतिनिधी |**

हॉटेल व्यवसायात भागीदारी करून नफा मिळवून देण्याचे आणि नंतर पैसे परत करण्याचे खोटे आश्वासन देऊन एका ७३ वर्षीय सेवानिवृत्त वृद्धाची तब्बल ३४ लाख १५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार मिरा रोड येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी पाच जणांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारीनुसार, मिरारोड पूर्व येथे तक्रारदार दिलीप सूर्यवंशी यांना पाच आरोपींनी मिळून मिरारोड पूर्व येथील हॉटेल मेट्रो पॅलेस येथे बोलावले. तिथे सर्वांनी संगनमत करून, कर्नाटक मधील कुंदापूर, जि. उडुपी येथे हॉटेल व्यवसाय सुरू करायचा आहे, असे सांगून सूर्यवंशी यांचा विश्वास संपादन केला. आरोपींनी फिर्यादी सूर्यवंशी यांच्याकडून वेळोवेळी ऑनलाईन माध्यमातून एकूण ३४ लाख १५ हजार रुपये घेतले. त्यानंतर सूर्यवंशी हे या हॉटेल व्यवसायातून बाहेर पडल्यावर त्यांचे पैसे परत देण्याचे खोटे आश्वासन आरोपींनी दिले होते. मात्र, दीर्घकाळ उलटूनही आरोपींनी सूर्यवंशी यांचे पैसे परत न करता त्यांची आर्थिक फसवणूक केली. अखेर शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सूर्यवंशी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी शेखर शेट्टी, मंजुनाथ पुजारी, सुधाकर पुजारी,सुधाकर हेडगे, अशोक व्यास या पाचही आरोपीं विरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसटी बस, कारची समोरासमोर धडक

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

आंबा घाटात गुरुवारी (दि.२१) सकाळी एक भीषण अपघात घडला. दख्खन बस थांब्याजवळ राज्य परिवहन मंडळाची बस आणि मारुती एर्टिका कार यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, चालकांसह एकूण पाच जण जखमी झाले आहेत.



प्राथमिक माहितीनुसार, एसटी बसचालक प्रल्हाद भिकाजी शिंदे (वय ५०, रा. भडकंबा) हे आपली बस घेऊन खडीकोळवण ते साखरपा मार्गावर जात होते. त्याचवेळी, सातारा येथील एर्टिका कारचालक संतोष शिवाजी पवार (५०) हे आपल्या कारने रत्नागिरीहून साताऱ्याच्या दिशेने प्रवास करत होते. आंबा घाटातील दख्खन बस थांब्याजवळ दोन्ही वाहने आली असता, वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने एसटी बस आणि कारची समोरासमोर अत्यंत जोरदार धडक झाली. या भीषण धडकेत दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला.

गाड्यांमध्ये अडकलेल्या जखमींना पोलिसांनी आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने बाहेर काढले. सर्व जखमींना तात्काळ साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातानंतर महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

# पोलीस शिपायाची दुचाकी चोरीला

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या पोलीस शिपायाची मोटरसायकल चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भायखळा पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

तक्रारदार हे मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. ते सध्या एका विभागात नेमणुकीसाठी आहेत. तक्रारदार हे एक मोटरसायकल वापरत होते. त्यांना नुकतीच १५ दिवसांची रजा मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी २ मे रोजी मोटरसायकल भायखळा येथील एका इमारतीच्या बाहेर पार्क केली होती. रजा संपल्यानंतर ते मुंबईत आले. कामावर रुजू होण्यासाठी ते सकाळी एका कार्यालयाबाहेर आले. तेव्हा त्यांना मोटरसायकल जागेवर दिसली नाही. त्यांनी मोटरसायकल शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोटरसायकल सापडली नाही. मोटरसायकल चोरीला गेल्याप्रकरणी त्यांनी भायखळा पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पोलीस दुचाकी चोरट्याचा शोध घेत आहेत.

# महापौरांकडून नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी

## कामांना गती देण्याचे आदेश

**| पनवेल-कळंबोली | प्रतिनिधी |**

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने पनवेल महानगरपालिकेने मान्सूनपूर्व कामांना वेग दिला आहे. नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही प्रकारच्या पूरस्थितीला सामोरे जावे लागू नये, यासाठी पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी कळंबोली शहरातील विविध भागांत जाऊन नाल्यांच्या सफाईची प्रत्यक्ष पाहणी केली आणि परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.



“पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये म्हणून नाल्यांची योग्य स्वच्छता आणि पाण्याचा सुरळीत निचरा होणे अत्यंत आवश्यक आहे,“ असे प्रतिपादन यावेळी महापौर नितीन पाटील यांनी केले. तसेच, त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कामात हलगर्जीपणा न करता, तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या कडक सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले.

या पाहणी दौऱ्यादरम्यान उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बाबन मुकादम आणि सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनी नालेसफाईच्या कामाची बारकाईने पाहणी केली. यासोबतच नगरसेवक रविंद्र भगत, विजय खानावकर, नगरसेविका मोनिका महानवर, सरस्वती काथारा, रायगड जिल्हा चिटणीस रविशेठ पाटील, रामदास महानवर, केशव यादव यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौरांच्या या दौऱ्यामुळे शहरातील नालेसफाईच्या कामाला आता अधिक गती मिळणार आहे.

## अधिकृत परवान्यासह व्यवसायाची संधी | प्रात्यक्षिक ज्ञानावर विशेष भर

# ड्रोन उडवण्याचे मोफत प्रशिक्षण

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेती, सर्वेक्षण, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन आणि सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेतर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण योजना राबविण्यात येत असून, प्रशिक्षणानंतर अधिकृत परवानाही दिला जात आहे. त्यामुळे युवकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत.



अमृत ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उद्योजकता विकास कार्यक्रम राबवते. त्याचाच एक भाग म्हणून ‘अमृत ड्रोन मिशन’ ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत ड्रोन ऑपरेटर (पायलट) बनण्यासाठी १० दिवसांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णपणे मोफत दिला जातो. राज्यातील आठ ठिकाणी हे प्रशिक्षण दिले जात असून, प्रात्यक्षिक ज्ञानावर विशेष भर दिला जातो. ड्रोनची सुरक्षित हाताळणी, देखभाल, उड्डाण तंत्र, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, जमिनीचे मोजमाप, एरियल फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध विषयांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) यांच्या सुरक्षित उड्डाण नियमावलीची माहितीही दिली जाते.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर लाभार्थ्यांना अधिकृत परवाना दिला जातो. तसेच स्वतः चा ड्रोन खरेदी करून व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांना अमृत संस्थेच्या कर्ज व्याजपरतावा योजनेचाही लाभ मिळू शकतो. अमृत संस्थेची ही योजना खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी आहे, ज्यांना इतर शासकीय महामंडळे किंवा संस्थांकडून लाभ मिळत नाही. योजनेसाठी अर्ज करणारा उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक असून त्याचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे.

### ऑनलाइन अर्जाची सुविधा

पुण्यातील औंध येथे अमृत संस्थेचे मुख्यालय असून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये संस्थेची कार्यालये कार्यरत आहेत. संस्थेचे संपूर्ण कामकाज ऑनलाइन पद्धतीने केले जाते. इच्छुक उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडक



## संयुक्त जयंती महोत्सव साजरा

**सुतारवाडी :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही पंचशील सेवा मंडळ दुरटोली यांच्या विद्यमाने भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चक्रवर्ती सम्राट अशोक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदींची संयुक्तपणे जयंती महोत्सव दि.१५ मे ते १६ मे रोजी दुरटोली येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी ध्वजारोहण, बुद्ध पूजापाठ, अल्पोपहार, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहभोजन, दुरटोली ते सुतारवाडी वृद्ध विहार भव्य मिरवणूक, विविध करमणुकीचे कार्यक्रम, विद्यार्थ्यांच्या भेटवस्तू देऊन सत्कार असे विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र केशव शिंदे, पंचशील सेवा मंडळाचे अध्यक्ष मंगेश केशव शिंदे तसेच व्यासपीठावर पत्रकार हरिश्चंद्र महाडिक, रवींद्र शिंदे, दिलीप शिंदे, गौतम शिंदे, हिरामण मोते, मंगेश पासलकर, चिंतामण दळवी, हनुमंत कर्जत. सूर्यकांत दळवी, संतोष दळवी, मनोहर साळवी, मोहन दोशी, अनंत घाडगे, अनंत शिंदे, संजय मोरे, बबलू शिंदे, सुधीर शिंदे, अंकुश शिंदे, सुनिल घाडगे, कृष्णा तटकरे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश मोरे यांनी केले. यावेळी अनेक उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.



## झाडांवर विषप्रयोग केल्याचा संशय

**ठाणे :** कल्याणमधील गणपती चौक ते डीपी चौक या रस्त्यालगतच्या निसर्गसौंदर्यात भर घालणाऱ्या टेबेबुईया म्हणजेच गुलाबी व पिवळी फुले येणाऱ्या झाडांना विषारी इंजेक्शन देऊन मारण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अज्ञात व्यक्तींनी झाडांच्या खोडांना ड्रिल मशीनने छिद्रे पाडून त्यामध्ये विषारी द्रव्य सोडल्याचा संशय आहे. या घटनेमुळे पर्यावरणप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास परिसरातील काही नागरिक मॉर्निंग वॉकसाठी गेले असता रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या टेबेबुईया झाडांच्या खोडांवर संशयास्पद छिद्रे दिसून आली. नागरिकांनी जवळ जाऊन पाहणी केली असता या छिद्रांमध्ये इंजेक्शनद्वारे विषारी द्रव्य टाकण्यात आल्याचे समजले. तसेच झाडांच्या सालीमधून पांढऱ्या रंगाचा द्रव बाहेर येत असल्याचेही निदर्शनास आले. काही झाडांची पाने पिवळी पडून गळाली होती. या प्रकाराची माहिती मिळताच नागरिकांनी तातडीने केडीएमसीच्या उद्यान विभागाशी संपर्क साधला. झाडांची हत्या करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना कठोर शिक्षा करावी, अशी मागणी वृक्षप्रेमींनी केली आहे.



## नांदगावच्या स्टेट बँकेत सर्व्हर बंद

**कोर्लई :** गेल्या चार दिवसांपासून मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत सर्व्हर बंद असल्याने यांचा दैनंदिन व्यवहारावर परिणाम होत आहे. देवाणघेवाण होत नसल्याने ग्राहकांना मुरुड गाठावे लागत असून ससेहोलपट होत आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने कानोसा घेतला असता, राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे रेवस-रेड्डी समृद्धी महामार्गाचे काम सुरु असून यात साळाव-मुरुड रस्त्यावर मोऱ्या आणि रस्त्याच्या कामात याठिकाणी असलेली भारत संचार दूर निगम लिमिटेड (बी.एस.एन.एल.) ची केबल अनेक ठिकाणी तुटल्याने याचा नेटवर्कवर परिणाम होऊन सर्व्हर बंद झाले आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजना, पैशाची देवाणघेवाण करण्यासाठी नांदगाव मजगाव पंचक्रोशीतील ग्राहकांना मुरुड गाठावे लागत असून त्रास व हाल सहन करावा लागत आहे. भारतीय स्टेट बँकेच्या वरीष्ठ अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## उरणमध्ये डिजिटल क्रांतीचा शुभारंभ



**उरण :** उरण तालुक्यातील फोटो, फ्लेक्स आणि बॅनर व्यवसायात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या नितीन फोटो स्टुडिओने आता डिजिटल प्रिंटिंग क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. “नितीन डिजिटल हब”च्या माध्यमातून उरणकरांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. गुरुवारी (दि.२१) उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या हस्ते या भव्य डिजिटल हबचे उदघाटन उत्साहात पार पडले. उरणमध्ये प्रथमच अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल प्रिंटिंगची सर्व कामे एका छताखाली उपलब्ध होत असल्याने व्यापारी, व्यावसायिक, विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. आतापर्यंत अशा दर्जेदार प्रिंटिंगसाठी मुंबई किंवा नवी मुंबई गाठावी लागत होती. त्यामुळे वेळ, पैसा आणि मनस्ताप सहन करावा लागत होता. मात्र आता ही सर्व सुविधा उरणमध्येच उपलब्ध झाल्याने उरणकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. उद्घाटन प्रसंगी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी ‘नितीन डिजिटल हब’मधील आधुनिक मशिनरीची पाहणी करत मालक नितीन मालुसरे आणि प्रणाली मालुसरे यांचे विशेष कौतुक केले. उरणसारख्या शहरात आधुनिक डिजिटल प्रिंटिंग व्यवसाय उभा राहणे ही अभिमानाची बाब असून स्थानिक युवक-युवतींनी अशाच प्रकारे उद्योगक्षेत्रात पुढे यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## निवडक



### मुरुडमध्ये घरगणना, जनगणना सुरु

**कोर्लई :** जनगणना २०२७ च्या अनुषंगाने मुरुड तालुक्यातील पहिल्या टप्प्यात दि.१५ मे ते १५ जून या कालावधीत घराची यादी आणि गृहनिर्माण गणना करीता नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षक घरोघरी भेट देत आहे. घरांच्या भेटी दरम्यान आवश्यक माहिती गोळा करण्यात येऊन घरगणना व जनगणना करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य जनगणना संचालनालयाचे संयुक्त सचिव आणि मुख्य प्रधान जनगणना अधिकारी यांच्याकडील पत्रान्वये जनगणना-२०२७ चा कार्यक्रम आखून दिलेला आहे. पहिल्या टप्प्यातील कामकाज म्हणजेच स्वतःची गणना ही दि.१ ते १५ मे या कालावधीमध्ये तसेच घर यादी व घरगणना दि.१६ मे ते १४ जून या कालावधीत नियोजीत आहे. या कालबद्ध कार्यक्रमानुसार मुरूड व रायगड जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यात घराची यादी आणि गृहनिर्माण गणना दि.१ मे ते दि.१५ जून दरम्यान होणार आहे.

### पुरुषोत्तम मास अनुष्ठानाला प्रारंभ



**पनवेल :** येथील प्रसिद्ध विरुपाक्ष मंदिरामधे अधिक मासा निमित्त पुरुषोत्तम मास अनुष्ठानाला प्रारंभ झाला आहे. दि.१७ मे ते १५ जून या कालावधीमधे हे अनुष्ठान संपन्न होणार आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अनुष्ठान कालावधीमध्ये दररोज सकाळी साडेसात वाजता विविध भाविकांच्या हस्ते ''श्रीराधापुरुषोत्तम'' पूजन संपन्न होत आहे. सायंकाळी ७.०० वाजता सामुहिक रित्या महालक्ष्मी अष्टक व विष्णूसहस्रनाम पठण, आणि रात्रौ युवा कीर्तनकार वर्षा रानडे-सहस्रबुद्धे यांचे कीर्तन संपन्न होत आहे. कीर्तनातील पूर्वरंगामधे श्रीमद्भगवतगीतेवर निरुपण आणि उत्तररंगामधे श्रीमद्भागवत या ग्रंथातील कथा सांगितल्या जात आहेत. कीर्तनाला धनंजय सोमण यांची संवादिनी व गणेश घाणेकर आणि शार्दूल डोंगरे यांची तबलासाथ आहे. भाविकांनी या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून भगवतभक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विरुपाक्ष मंदिर न्यासाच्या वतीने करणात आले आले आहे.



### वाचनालयातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**श्रीवर्धन :** येथील सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने इयत्ता १० वी व १२ वीच्या परिक्षेत तालुक्यातील शाळा व महाविद्यालयांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्य विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा बुधवारी (दि.२०) सार्वजनिक वाचनालय श्रीवर्धन या संस्थेच्या सभागृहात पार पडला. या गुणगौरव सोहळ्यामध्ये इयत्ता १० वीच्या परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले गुणवंत विद्यार्थी मिहीर देशमुख, सौम्या सावंत, निष्ठा चौलकर, संस्कृती कोलथरकर, अरिशा चोगले आदी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये महर्षी कर्वे मॉडेल स्कूल श्रीवर्धनचे प्राचार्य दत्तात्रय राणे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शनही केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वाचनालयाचे उपाध्यक्ष विनय वैद्य यांनी केले. तसेच, वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे यांनी मनोगत व्यक्त केले. या गुणगौरव सोहळ्याकरीता वाचनालयाचे कार्यवाह गणेश सावंत, सदस्य डॉ. राजेश तोडकर, पालकवर्ग, वाचनालयाचे सभासद व वाचक उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार- २५००० महिना + इन्सेंटिव्ह. Contact- 9823585321
- **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी** खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २० मे २०२६, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी** येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- **jai santoshi maa CNG Alibag** wadgav 1) Fillerman 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# ग्रामीण भागात रुग्णवाहिकेची गैरसोय

**■ रुग्णावर ताटकळत राहण्याची वेळ ■ नातेवाईकांमधून संताप व्यक्त**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे उपचार घेत असलेल्या रुग्णाला तब्बल तीन तासांनी रुग्णवाहिका उपलब्ध झाली. विषबाधा झालेल्या रुग्णाला रुग्ण वाहिकेसाठी ताटकळत रहावे लागल्याने संताप व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यातील खांदण गावातील एका व्यक्तिला बुधवारी (दि.२०) विषबाधा झाली. ही घटना घडताच त्यांना सायंकाळी ६.०० वाजता कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यासाठी आणण्यात आले. परंतु, विषबाधा जास्त प्रमाणात लागल्यामुळे त्या



रूणाला पुढील उपचारासाठी उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटल येथे हलवण्यास सांगितले. त्यानंतर प्राथमिक उपचार केल्यानंतर सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास १०८ ची रुग्णवाहिका मिळावी म्हणून संपर्क करण्यात आला. त्यानंतर रुग्णवाहिका लवकरच पोहचेल, असे सांगण्यात आले. परंतु, एक तास होऊन देखील रूग्णवाहिका आली नाही. त्यामुळे नातेवाईकांनी पुन्हा १०८ ला कॉल केला. त्यावेळी रूग्णवाहिका चालकाने, मी अलिबाग वरून आलो आहे, त्यामुळे तात्काळ येऊ शकणार नाही. मला रूग्णवाहिका घेऊन हॉस्पिटलमध्ये येण्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे किमान रात्री साडेआठ वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये पोहोचेन, अशी उत्तर देऊन कॉल कट केला. त्यामुळे विषबाधा झालेल्या रुग्णाची प्रकृती ढासळली. त्यानंतर नातेवाईकांनी डॉक्टरांना रुग्णवाहिकेबद्दल विचारणा करण्यास सुरुवात केली. परंतु, त्यांच्याकडून देखील काहीही प्रतिसाद मिळत नसल्याने रुग्णाची स्थिती पाहून सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

या दरम्यान, सरकारच्या अधिपत्याखाली चालवली जाणारी १०८ नंबरची रूग्णवाहिका रूग्णांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप रूग्णाच्या नातेवाईकांकडून करण्यात आला. तसेच, रुग्णाच्या जीवाचे काही बरं वाईट झाले तर याची जबाबदारी १०८ रूग्णवाहिका घेणार का? असा सवाल नातेवाईकांकडून करण्यात आला.त्यानंतर ग्रामीण रुग्णालय कशेळे येथील डॉ. बाबासो कालेल यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून तात्काळ रूग्णवाहिकेची सोय करण्यात आली. परंतु, रुग्णवाहिका उपलब्ध होण्यास तीन तासांचा वेळ लागल्याने कशेळे ग्रामीण रुग्णालयात रूग्णवाहिके बद्दल निर्माण झालेला प्रश्न पुन्हा समोर आला आहे. कशेळे परिसर आदिवासी बहुल असून, गोरगरिबांच्या उपचाराची सोय या ग्रामिण हॉस्पिटलमध्ये होत असते. परंतु, रूग्णाला पुढील उपचारासाठी इतरत्र हॉस्पिटलमध्ये हलवण्यात सांगितल्यानंतर अनेक वेळा रूग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय होताना दिसत आहे. त्यामुळे रूग्णांची होणारी ही गैरसोय कधी संपणार? आणि नवीन रुग्णवाहिका कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## यशवंत भवारे यांची फेरनिवड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून यशवंत भवारे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडून यशवंत भवारे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. मनसेचे कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून दोन वर्षांचा कालावधी पूर्ण करणारे यशवंत भवारे यांच्यावर पक्षाने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांच्या नियुक्त्या



नव्याने करण्यात येत आहेत. तालुका अध्यक्ष पासून जिल्हा उपाध्यक्ष अशाप्रकारे नवीन कार्यकर्त्यांना संधी देण्याचे पक्षाचे धोरण मार्च महिन्यात किल्ले रायगडाच्या पायथ्याशी झालेल्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केले होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने नवीन पदाधिकारी नियुक्त्या केल्या जात आहेत. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून यशवंत भवारे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. यशवंत भवारे हे यापूर्वी तालुका उपाध्यक्ष आणि नंतर मागील दोन वर्षे तालुका अध्यक्ष या पदावर कार्यरत होते.

## रेवदंड्यात याग सोहळा उत्साहात



**। रेवदंडा । प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रचार-प्रसार अंतर्गत आयोजित ग्राम अभियान मांदियाळी सोहळ्याचे औचित्य साधून रेवदंडा येथे श्री स्वामी याग व श्री विष्णु याग सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हा सोहळा गुरुवारी (दि.२१) रेवदंडा येथील कान्होजी आंग्रे नगर येथील श्री साईबाबा मंदिरात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) यांनी केले होते. या सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवेचा लाभ घेतला. या सोहळ्याचे दिंडोरी प्रणित सेवा केंद्राच्या सेवेकऱ्यांनी संपूर्ण नियोजन उत्कृष्टपणे सांभाळले.

## प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत तपासणी




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत रस्ते सुरक्षेसाठी तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी सातत्याने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. यादरम्यान, सर्व सुजान नागरिकांनी रस्त्यावरील होणारे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी व रस्ता सुरक्षिततेसाठी वाहतुक नियमांचे पालन करावे. तसेच, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत व सुरक्षित वाहन चालन करावे, असे आवाहन सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी केले आहे.

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे रस्ता सुरक्षतेच्या अनुषंगाने विना हेल्मेट, अवैध विमा, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, वैद्य पीयुसी प्रमाणपत्रे नसलेली वाहने, अवैध प्रवासी वाहतूक, विना नंबरप्लेट रस्त्यावर चालणारी वाहने, ऑटो रिक्षा नियमभंग, ओडिसी वाहतूक करणारी वाहने, वैद्य परवाना नसलेली वाहने, अशा प्रकारच्या विविध गुन्ह्यांसाठी या कार्यालयातर्फे निरंतर विशेष मोहिमा राबविण्यात येतात. गौण खनिज व ओव्हरलोड मालवाहतुक करणाऱ्या वाहनांवर विशेष तपासणी मोहिमा व कडक कारवाई करण्यात येत आहे. गेल्या दोन महिन्यांत साधारणतः २३५ वाहनांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. एकूण तडजोड शुल्क रुपये १२८.९६ लाख इतका आकारण्यात आला आहे.

## नफ्याच्या प्रलोभनातून लाखोंची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

क्रिप्टो करन्सीच्या गुंतवणुकीवर मोठा नफा आणि ३० टक्के कमिशन देण्याचे आमिष दाखवून कामोठ्यातील एका व्यक्तीची तब्बल ८ लाख ९५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुहास फडतरे यांना फेसबुकवरून आरोपीने संपर्क साधला होता. त्यानंतर व्हॉट्सअप नंबर देऊन क्रिप्टो करन्सी प्लॅटफॉर्म बाबत माहिती दिली. सुहास फडतरे यांचा विश्वास संपादन करण्यासाठी सुरुवातीला त्यांच्याकडून १० हजार रुपये गुंतवून घेतले. त्यानंतर ११ हजार ७९७ रुपये परताव्यासह त्यांच्या खात्यात जमा केले. त्यानंतर फडतरेला आरोपीने टेलिग्रामवरील गुंतवणूक सल्लागार गटात सहभागी करून घेतले. नफ्यावर ३० टक्के कमिशन देण्याचा ऑनलाइन करार करून वेळोवेळी रक्कम गुंतवण्यास भाग पाडून एकूण ८ लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक केली.

## प्रदूषणापासून सावध रहाः चव्हाण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात मागील काही वर्षांत सतत प्रदूषण वाढत आहे. वाढत्या प्रदूषणाने श्वसन विकारात वाढ झाली असून, श्वसनाचे त्रास रोखण्यासाठी मोकळ्या हवेत व्यायाम करणे, चालणे यावर भर द्यावा, असे आवाहन छातीरोग तज्ज्ञ डॉ. विनोद चव्हाण यांनी केले आहे. कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे नुकतेच ''क्रॉनिक कफ'' (दीर्घकालीन खोकला) या विषयावर कर्जत चौक रस्त्यावरील एका रिसोर्टमध्ये वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कोकिलाबेन हॉस्पिटलचे प्रख्यात छाती रोगतज्ज्ञ डॉ. विनोद चव्हाण हे उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला रायगड मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, ज्येष्ठ डॉक्टर डॉ. मनोहर साबणे, डॉ. प्रेमचंद जैन, डॉ. हेमंत गांगोलिया, डॉ. बी.जी. लाड, डॉ. सुहास शितुत, कर्जत मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. आशिष कर्वे, उपाध्यक्ष डॉ. रितेश जैन, खजिनदार डॉ. राहुल ओसवाल, डॉ. कुमार ओसवाल, डॉ. विकास गोमारे, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. दिगंबर पवार, डॉ. गजानन चव्हाण तसेच कर्जत मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## संभेच्या माजी सरपंचांचा प्रामाणिकपणा

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

संभेचे माजी सरपंच पांडुरंग महाबळे हे बुधवारी (दि.२०) आपल्या दुचाकीवरून कोलाड नाक्यावरील उड्डाण पुलाखालून जात होते. त्यावेळी त्यांना रस्त्यात कोणाचातरी मोबाईल पडलेला दिसला. त्यांनी त्या ठिकाणी थांबून तो मोबाईल आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर तो मोबाईल त्यांनी कोलाडचे सहाय्यक पोलीस निरिक्षक भारत



फारणे यांच्याकडे दिला. त्यांनतर हरवलेल्या मोबाईल मालकानके त्याच्या हरवलेल्या मोबाईलवर कॉल करून तो कोलाड पोलीस ठाण्यात आला. संबंधित मोबाईल मालक हा मुंबई येथील असून, सर्व मोबाईलची खात्री झाल्यानंतर तो मोबाईल पांडुरंग महाबळे यांनी कोलाडचे सपोनि भारत फारणे यांच्या उपस्थित संबंधित मोबाईल मालकाला परत दिला. त्या मोबाईलची किंमत साधारण २५ हजार रुपयांची असल्याचे सांगण्यात आले. या प्रामाणिकपणाबद्दल संभेचे माजी सरपंच पांडुरंग महाबळे यांचे मोबाईल मालकाने आभार मानले.

## खैरकाठी वाडीतील हपसा दुरुस्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील रानसई ग्रामपंचायत हद्दीतील खैरकाठी या आदिवासी बांधवांच्या पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव असलेली हापसा (बोर) नादुरुस्त झाली होती. जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष पाटील यांनी त्याच्या सहकाऱ्यांच्या मदतीने ती दुरुस्त करुन येथील बांधवाचा पिण्याचा प्रश्न सोडविला आहे.

यंदा उन्हाळा सुरू झाल्यापासून रानसई ग्रामपंचायत हद्दीत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. त्यात रानसई ग्रामपंचायती हद्दीतील दोन वाड्यांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव असलेली हापसा ही



नादुरुस्त झाली होती. त्यामुळे येथील नागरिकांना महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी तासंतास थांबावे लागत होते. या बांधवांसाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील यांनी टँकरची व्यवस्था केली. परंतु, येथील नागरिकांना हक्काची असलेली हापसा दुरुस्त करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मंगळवारी (दि.१९) डॉ. मनिष पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खैरकाठी येथे जाऊन हापसा खोलून दुरुस्त केली. यावेळी डॉ. मनीष पाटील यांच्यासह दत्ता पाटील, दिनकर पाटील, प्रतीक पाटील, परेश पाटील, मंगेश मोकल, उमेश भोईर तसेच आदिवासी बांधव उपस्थित होते.

## विश्वशांती हरिनाम महोत्सवाला सुरुवात

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

परंपरेनुसार चालत आलेला श्री. पुरुषोत्तम (अधिक)जेष्ठमास निमित्त अखंड विश्वशांती हरीनाम महोत्सवाला जेष्ठ शुद्ध प्रतिपदा शके १९४८ रविवारी (दि.१७) सुरूवात झाली आहे. हा अधिक मास महोत्सव मिती अधिक जेष्ठ शुद्ध प्रतिपदा शके १९४८ रविवार दि.१७ मे ते अधिक जेष्ठ वद्य अमावस्या सोमवार दि.१५ जून या कालावधीत नारायण अलिबागकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर येथील सद्गुरू गणपत अलिबागकर यांच्या मठात संपन्न होणार आहे.

या निमित्ताने दररोज पहाटे नित्य काकड आरती भजन व नित्यपूजा, सकाळी बीज मंत्र जप, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, तुकोबाराय गाथा भजन, दुपारी विश्रांतीनंतर श्रीमद महाभारत व श्रीमद् भागवत ग्रंथ वाचन, सायंकाळी हरिपाठ, रात्री श्रीहरी किर्तनानंतर जागर होणार



आहे. आपणा सर्वांच्या जीवनात मोठा अमृतयोग असून, सर्व भाविकांनी उपस्थित रहावे, अशी विनंती भरत नारायण अलिबागकर श्री क्षेत्र पंढरपूर यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

**पालीमध्ये भव्य रोजगार मेळावा | शेकडो तरुणांना मिळाले कॉल लेटर**

## तरुणाईला रोजगाराची सुवर्णसंधी

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

तरुण-तरुणींना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुधागड तालुका मराठा समाज आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल यांच्या संयुक्त विद्यमाने पाली येथे एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले. पाली येथील मराठा समाज भवनमधील स्व. सटूराम सखाराम साजेकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या भव्य रोजगार मेळाव्याला सुधागड तालुक्यातील शेकडो सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, अनेक उमेदवारांची जागेवरच मुलाखत घेऊन त्यांना तात्काळ नोकरीचे कॉल लेटर सुपूर्द करण्यात आले.

हा मेळावा सुधागड मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. तालुक्यातील तरुण-तरुणींना त्यांच्या हक्काच्या रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध करून देणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांमधील हजारो पदांच्या संधी




● (छायाचित्र: धम्मशील सावंत)

उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ग्रामीण भागातील अनेक गरजू व हुशार तरुणांनी या संधीचे सोने करत आपले भविष्य सुरक्षित केले. ग्रामीण भागातच, घराच्या जवळ नामांकित कंपन्यांच्या मुलाखती देण्याची संधी मिळणे आणि थेट हातात नोकरीचे कॉल लेटर मिळणे हा ग्रामीण भागातील तरुणांसाठी अत्यंत सुखावह क्षण होता. त्यामुळे उपस्थित तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक तसेच मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

उमेदवारांचे योग्य समुपदेशन करून त्यांच्या मुलाखती घेण्यासाठी यशस्वी अकॅडमी फॉर स्किलचे तज्ज्ञ अधिकारी मीडिया मॅनेजर (पुणे) योगेश रांगणेकर व सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी रोजगार मेळाव्यात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. असोसिएट मीडिया विभागाचे ज्ञानेश्वर गोफण यांच्यासह सर्व तज्ज्ञ चमूने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मुलाखतींचे आयोजन करून योग्य उमेदवारांची निवड केली.

# पनवेलमधील महिलेची फसवणूक

**पनवेल :** पोलीस असल्याचे भासवून एका महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये राहून तिची दिशाभूल केली. याप्रकरणी अच्युतराव प्रकाश जावीर (३५) विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेसोबत जावीरने ओळख करून आपण पोलीस असल्याचे भासवत तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर आपला घटस्फोट झाल्याचे सांगून पीडित महिलेबरोबर रिलेशनशिपमध्ये राहून दोघांनी लग्नही केले. परंतु, आपली फसवणूक झाल्याचे कळताच फसवणूक केल्याप्रकरणी महिलेने खांदेश्वर पोलिसांत तक्रार केली.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.अशोक भागचंद मिरचंदानी व इतर | १२६/७/अ | ००-६३-०० पो.ख. ००-१९-०० एकुण- ००-८२-०० | ०-४७ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २२/०५/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि.रायगड.
मो.नं.९४०३६४७९५३

## जाहीर आवाहन

कर्जत तालुक्यात कार्यरत असलेल्या एका मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेस आपली अनुदानित शाळा (इयत्ता पहिली ते दहावी) काही कारणास्तव चालविण्यासाठी देणे आहे अथवा हस्तांतरित करावयाची आहे. इच्छुक संस्थानी/व्यक्तींनी या संदर्भातील आपले प्रस्ताव आपल्या संपूर्ण माहितीसह पुढील मोबाईल नंबरवर ७७५६०४१७९९ दि. ३० मे २०२६ पर्यंत माध्यमातून संपर्क साधावा. त्या नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

त्याबाबतचा अंतिम निर्णय संस्थेने नेमलेल्या काळजीवाहू समितीकडून घेतला जाईल व त्याबाबत कोणालाही कुठेही तक्रार करण्याचा अधिकार असणार नाही.

ठिकाण : दहिवली कर्जत

**कार्याध्यक्ष**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकतीं मिळकतींचे विद्यमान मालक सौ. नयना रामदास झळके, रा. ०५ प्लॉट नं ६८ उलवे रायगड ४१०२०६ यांचेकडून कायम खरेदीकरणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे - नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|
| २६७ | ०.१२.०० | ०.०४ |
| २७१ | ०.५८.०० | ०.१६ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्युपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५(पंधरा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २१/०५/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे मालक श्री. शैलेश माधव चांगले यांचकडुन आमचे अशिल १.छवी खन्ना व २. अनुराग चांदना यांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौमी | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १ | क/३३ | २.९४.३८ | २९.४३ |
| १ | क/३४ | २.९४.३५ | २९.३५ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - २२-०५-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस,एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं -९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे मालक श्री. शैलेश माधव चांगले यांचकडुन आमचे अशिल १.जगमोहन सिंह भंवर व २.कोमल भंवर यांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौमी | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १ | क/६ | २.५७.९६ | २५.७९ |
| १ | क/७ | २.६०.४७ | २६.०४ |
| १ | क/१४ | २.६१.४१ | २६.१४ |
| १ | क/१५ | २.५३.६९ | २५.३६ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - २२-०५-२०२६

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस,एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
### ई-निविदा आमंत्रण सूचना

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत. **कामाचे नावः** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी विभागांतर्गत नातुवाडी, करबुडे, टिके आणि बेरडेवाडी बोगद्यांमधील वाहतूक सुरू असताना बॅलेस्टलेस ट्रॅकची दुरुस्ती करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2026-05. अंदाजित किंमतः** रु. 3,52,48,560/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/वेळः** 12.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधीः** बारा महिने मान्सून सह. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारबुर्डी, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. दिपक नामदेव बोरकर व श्री विजय नामदेव बोरकर यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक सुरेखा प्रकाश काटकर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारबुर्डी | ६ | ०.२१.०० पो.ख.०.०१.०० एकूण क्षेत्र ०.२२.०० | १.८७ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाणः पेण
दि. २२/०५/२०२६

सही
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

## जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की जोनाथन सॅम्यूएल सोलोमन यांनी आमच्या अशिलांसमवेत सर्व भारांपासून मुक्त तसेच स्पष्ट व विपणनयोग्य हक्क असलेल्या खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत शेतजमीन विवरण गट क्र. २७८, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या शेतजमीनीच्या भागावर (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) हक्क मार्ग मंजुरीकरिता बोलणी केली आहेत.

कोणीही व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, मृत्यूपश्चात वारसा, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, निषेधाज्ञा, गहाण, प्रभार, न्यास, उत्तराधिकार, वारसा वा कंत्राट वा सामंजस्य करार, सुविधाधिकार, हक्क- मार्ग, ताबा, कब्जा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय उपभोग, सुविधाजनक हक्क, स्थायी व शाश्वत हक्क मार्ग आदी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात

कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद ॲन्ड कं., वकील, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे किंवा इ मेलच्या माध्यमातून <harshil.parekhpurnanand.co.in> येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आमचे अशील हे असे हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी अधित्यागित व परित्यागित आहेत असे गृहीत धरतील. पुढे, सदर सूचना कालावधीत कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास, असे कोणतेही दावे नाहीत असे गृहीत धरले जाईल.

**अनुसूची**
**सदर मालमत्तेचे विवरण**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या रिक्त शेतजमीन वा भूभागाचा सर्व तो भाग व भूखंड, विवरण गट क्र. २७८, मोजमापित ० हेक्टर ७९ आर २० चौ. मी. , ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलीबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे - पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. ४७८/१ व २७६, पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र.. २८१, २८० व २७९, दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र.. २७४ व २७२, उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ३१०/१ व ३१०/२.

**दिनांक : २२ मे, २०२६**

**पूर्णानंद ॲन्ड कं. करिता**
वकील व सॉलिसिटर्स
६५, टॅमरिंड लेन, फोर्ट चेंबर्स, सी विंग, २ रा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३.ई मेल : harshil.parekh@purnanand.co.in

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
### ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, क्षेत्रीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी हे पुढील कामासाठी ई-ओपन टेंडर आमंत्रित करत आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील चिपळूण रेल्वे स्थानकावर 250 केवीए क्षमतेच्या डिजी सेटचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/8/2026 दिनांक 22/05/2026, अंदाजित खर्च** – ₹ 23,69,908/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 47,400/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 12/06/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी क्षेत्रीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
### निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी येथील वरिष्ठ विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांच्या वतीने अनुभवी कंत्राटदारांकडून "करंजाडी सायडिंग येथे आयपी आधारित व्हिडिओ सर्व्हेलन्स सिस्टम (सीसीटीव्ही) पुरवठा, प्रतिष्ठापन व कार्यान्वयन तसेच कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील चिपळूण स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. 3 जवळील फिरत्या क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरा प्रणालीची व्यवस्था करणे" या कामासाठी ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-03-2026-27 दिनांक 22.05.2026, कामाची अंदाजित किंमतः** रु. 15.29/- लाख (जीएसटी वगळून), **ईएमडी रक्कमः** रु. 30,600/-, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळः** 12.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्याः www.ireps.gov.in

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्री.भारत बाळकृष्ण फाटक व श्री.अनिरूद्ध बाळकृष्ण फाटक, राहणार पुणे, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग. | १६६/१९०/१९६/ १९७/१९८/९६ | ५-२५-०० एकूण | ५२-५० |

अलिबाग,
दिनांक : २१/०५/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग
### सभासदांसाठी महत्वाची सूचना

महाराष्ट्र शासनाने नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थासाठी दि.२९ जुलै २०२५ रोजी सुधारित आदर्श उपविधी लागू केले आहेत. सदर उपविधीतील कलम ११(२ब) मध्ये दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दुरुस्ती करून घेतली आहे. त्यानुसार सभासदत्वासाठी प्रत्येक व्यक्तीने रु. १०/- प्रवेश शुल्क व रु.१००/- प्रमाणे १० भागांची रक्कम रु.१०००/- संस्थेत भरणा केली पाहिजे असे नमूद केले आहे. उपरोक्त दुरुस्तीस मा. उपनिबंधक यांची मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मध्ये सभासद हक्क कर्तव्ये उपकलम १/२ मध्ये म्हटल्याप्रमाणे कोणत्याही सदस्याने त्याच्या सदस्यत्वाबाबत उपविधीमध्ये विहित करण्यात येईल व विनिद्धिष्ट करण्यात येईल अशी रक्कम पूर्णपणे चुकती करे पर्यंत सदस्याला आपल्या हक्काचा वापर करता येणार नाही. संस्थेने भाग भांडवलातील सदस्याच्या किमान अंशदानात वाढ केली असेल तर त्याबाबत संस्था अशा सदस्याला अंशदानाच्या वाढीव मागणीची नोटीस देईल व ते वाढीव अंशदान जमा करण्यासाठी वाजवी कालावधी देईल.

त्यानुसार रु.१००/- ते रु.९००/- भाग भांडवल जमा असणाऱ्या २१००० सभासदांना कमळ नागरी सहकारी पतसंस्था अलिबाग असे सूचित करीत आहे की, उपरोक्त नमूद केलेल्या तरतुदीनुसार दि.३१ जुलै २०२६ पर्यंत आपण आपले भाग भांडवलाची एकत्रित रक्कम रु. १०००/- करणेसाठी कमी असलेली रक्कम आपल्या अर्जासोबत नजीकच्या शाखेत जमा करावी. सदर सभासदांची यादी मुख्य कार्यालयात व नजीकच्या शाखेत सूचना फलकावर लावण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत पूर्तता न केल्यास आपणास कायद्याने दिलेल्या हक्काचा वापर करता येणार नाही.

**सेक्रेटरी**
**कमळ नागरी सह. पत. अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली श्रीमती. हीना दिनेश भगत, पत्ता रा, ७०२ मेफेअर मीस्टीक टॉवर, आर बी. मेहता रोड, विक्रांत सर्कल जवळ, घाटकोपर (पूर्व), महाराष्ट्र, मुंबई ४०००७७, यांच्या मालकीची सर्व्हे क्र./ गट क्र.८, भोगवटदार वर्ग. १, एकुण क्षेत्र ०-२४-५०, (या संपुर्ण क्षेत्रासाठी मालकी हक्क असणारी) जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ. नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव | सर्व्हे क्र./ गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती.हीना दिनेश भगत | मौजे. मालेगाव त. कोतल खलाटी, तालुका. कर्जत जि.रायगड | ८ | ला.यो. ०-१७-२० पो.ख. ०-०७-३० |
| | | | एकुण क्षेत्र | ०-२४-५० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहीवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे खाली नमूद पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत दाव्यात वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध, स्वारस्य, आक्षेप व दावा नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. तसेच सदरहू जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती दावा, आक्षेप, रद्द/ त्यागलेला आहे असे समजण्यात येऊन, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

दिनांक :- /०४/२०२६

सही/-
**ॲड. उदय व्ही.कबीर**
C/O. पत्ता :-९०९, मयुरेश स्क्वेअर,
सेक्टर.१५, प्लॉट क्र.१७, सीबीडी बेलापूर
नवी मुंबई ४००६१४
मोबाईल क्रमांक ९००४०७१४२२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री विठ्ठल राघवा सपालिंगा कल्याण जनता सहकारी बँक जवळ कल्याण वेस्ट कल्याण ठाणे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिन मौजे उसलोरी, ता.मुरुड, येथे असून आम्ही चंद्रकात काशिनाथ घरत आणि संदिप कमलाकर डंगर राहणार बळवली ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून आम्ही खालील वर्णनाची जमिन विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| उसरोली | विठ्ठल राघवा सपालिंगा | ४९३/१ | ०.२७.०० | ४.२९ |
| उसरोली | विठ्ठल राघवा सपालिंगा | ४९३/२ | ०.७२.१० | ७.५२ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत आम्ही स्वतः कायमस्वरूपी विकत घेत आहो. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, करार, खोटेखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत आमची कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक :२२/०५/२०२६

**चंद्रकांत काशिनाथ घरत,**
रा.बळवली, ता. पेण जि.रायगड
फोन नंबर-९२२६१६१९५५

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझ्या अशिलांकडून मला खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जागेसंदर्भात (**"सदर जागा"**) **लोढा डेव्हलपर्स लिमिटेड** (पूर्वीची मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड म्हणून ज्ञात), कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत संस्थापित व नोंदणीकृत एक कंपनी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ४१२, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर जागा वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, भेट, गहाण (समतुल्य वा अन्य), प्रतिभूती, प्रभार, धारणाधिकार, भाडेकरार, वहिवाट, न्यास, उत्तराधिकार, ताबा, मुखत्यारपत्र, अनुज्ञप्ती, वारसा, कंत्राट, सामंजस्य करार, कुटुंब व्यवस्था, तडजोड, कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा व आदेश, विचाराधीन विवाद, निषेधाज्ञा, स्थगिती, यथास्थिती, जप्ती वा कोणतेही दायित्व वा वचनबद्ध वा कोणत्याही स्वरूपातील मागणी स्वरूपात कोणताही दावा असल्यास किंवा सदर जागेसंदर्भात अन्य काही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना सहाय्यक दस्तावेजांसमवेत लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा व्यक्तीचे दावे अधित्यागित व /वा परित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(सदर जागेचे विवरण)**

एक सेल्फ कन्टेन्ड ५ बीएचके फ्लॅट क्र. २७०१, २७ वा मजला, मोजमापित ४०८३ चौरस फूट (अर्थात ३७९.३२ चौ. मी.) रेरा चटई क्षेत्रफळ, ३ कार पार्किंग जागांसमवेत, टॉवर ए -व्हेंडोम क्लस्टर नावाने ज्ञात नवीन इमारतीतील, खालील विवरणीत जागेवर निर्मित,

| गाव | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | क्षेत्र (चौरस मीटर मध्ये) |
|---|---|---|
| ढोकावडे | १९८/१ | ५०० |
| ढोकावडे | १९८/२ए/१ | २९५० |
| ढोकावडे | १९९/० | ३४४० |
| ढोकावडे | २००/० | ३६१० |
| ढोकावडे | २०१/१ | ५२९० |
| ढोकावडे | २०२/२ | ५६०० |
| ढोकावडे | २०३/० | ५३३० |
| ढोकावडे | २०७/० | १३७५० |
| एकूण क्षेत्र | | ४०४७० |

एकत्रित ४०४७० चौ. मी. वा जवळपास, गाव ढोकावडे, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील.

**मुंबई,**
**दि. २२.०५.२०२६**

**सही/-**
**ॲडव्होकेट महेश लाड**
द्वारा **वाय. के. भगवागर ॲन्ड कं**
डी ब्लॉक, ४था मजला, शिवसागर इस्टेट,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई- ४०० ०१८.

## जाहीर नोटीस

दिनांक २१/०५/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री कुमार विश्वनाथ यांचे स्वकष्टार्जीत मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीत मौजे नांगुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड येथे सर्व्हे व हिस्सा क्र.४७/१, क्षेत्रफळ १-१८-४, पैकी ०-२०-० गुंठे क्षेत्राची (नांगुर्ले तिघर रस्त्याचे डाव्या बाजुला लगत असणारी) मिळकत आहे.

उपरोक्त मिळकत आमचे अशिल श्री कुमार विश्वनाथ यांचे कडे स्वकष्टार्जीत मालकी हक्काने व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीत आहे.

वरील प्रमाणे परिस्थीती कायम असताना काही इसम सदरील मिळकत विक्री करावयाची असे खोटे भासवुन उपरोक्त मिळकतीमध्ये फौजदारी अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. मात्र आमचे अशिल श्री. कुमार विश्वनाथ यांना उपरोक्त मिळकत विक्री करावयाची नाही.

सबब कोणाही इसमाने कोणत्याही प्रकारे खोटा आभास तयार करु नये, तसेच उपरोक्त मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करु नये, तसे झाल्यास आमचे अशिल हे संबधीत इसमांविरुद्ध कडक दिवाणी फौजदारी कायदेशीर कार्यवाही केली जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. सुवर्णा अशोक मिसाळ**
पत्ता - दुकानगाळा नं. ०७,
श्रीदर्शन को. ऑ.हौ. सोसायटी,
प्लॉट नं. ९५/९६, सेक्टर - ३४,
कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९
मो.नं. ९५९४२२०६३१

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
कार्या- ब्लॉक नं.८, पहीला मजला,
साई सावली को.ऑप. हौ. सोसायटी
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.नं. ९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पाले, ता. पेण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पो | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| २४/१८ | एकूण क्षेत्र १-०९-७० हे.आर | १.३७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मुदतीत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणताही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २२/०५/२०२६

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहिली तर्फे वरेडी ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अशोक लोटीराम दुर्गे मंदा गोटीराम तुपे मिरा. महेंद्र घरत | १४ | ४ | ०-१४-७० | ०= ६६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- नेरळ
दिनांक :- २२/५/२०२६

**ॲड.अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपॉर्टमेंट
ब्लॉक नं १०१ नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो० ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, जिल्हा रायगड, तालुका-सुधागड, मौजे नवघर येथील शेतजमीन मिळकत आमचे अशिल यांनी यशवंत रामचंद्र दळवी, मिलिंद गणपत देशमुख, साधना मंगेश पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरवले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे आर पॉ | आकार रु पै |
|---|---|---|---|
| २४४ | ० | ०-२०-० | ०-०७ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचेही, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, ताबा, देणगी, इजमेंटचे अधिकार किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आम्हास कळवावे. त्याप्रमाणे न कळवल्यास सदर व्यवहारात कोणाचीही कसलीही तक्रार नाही असे समजून वर्णन केलेल्या जमिनीचा विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

स्थळ- सुधागड पाली
दिनांक- २१/०५/२०२६

**हृषिकेश नारायण जोशी**
अधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय
८०९, नेमीनाथ हाइट्स, कर्जत रायगड
मो. ९६७३८९४००५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट-मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्युम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## मनोजकुमार कुंभारकर बिनविरोध



**पनवेल** : पनवेल तालुक्यातील चिंध्रण ग्रामपंचायतीमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मनोजकुमार शिवराम कुंभारकर यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा प्रमुख दिपक निकम, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, महानगर प्रमुख समाधान काशीद, तालुका प्रमुख संदीप तांडेल, उप तालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, विभाग प्रमुख प्रमोद पाटील, शाखा प्रमुख किशोर काकडे हे उपस्थितीत होते.

## डॉ. महेश निमणे यांचा सन्मान



**पाताळगंगा** : समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपत आपल्या ज्ञानाच्या माध्यमातून अनेक कुटुंब सुखी आणि समाधानी केले. त्यांच्या या उपक्रमाची दखल घेत. डॉ. महेश एकनाथ निमणे यांना प्रतिष्ठेचा वास्तुरत्न भारत श्री पुरस्कार पुणे येथील पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ येथे सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. समाजकार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र श्रम कामगार संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. कार्य सन्मान... राष्ट्राचा अभिमान या प्रेरणादायी ब्रीदवाक्याला अनुसरून, समाजाच्या प्रगतीसाठी आणि जनहितासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना या मंचावरून गौरविण्यात आले. विविध सामाजिक उपक्रम, जनजागृती कार्यक्रम तसेच समाजहिताच्या कामांमध्ये त्यांनी दिलेले योगदान लक्षणीय मानले जाते. त्यांच्या कार्यातील प्रामाणिकपणा, निष्ठा आणि सातत्यपूर्ण योगदानामुळेच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.हा पुरस्कार मिळाल्यानंतर डॉ. निमणे यांच्या कार्याचा गौरव होत असून खोपोली परिसरासह विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बालसंस्कार शिबीर उत्साहात



**पाताळगंगा** : बालकांमध्ये भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये व चांगले संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने भागवत धर्म सेवा प्रतिष्ठानतर्फे भारतीय संस्कृती संस्कार माला अर्थात बालसंस्कार शिबिराचे आयोजन गेले दहा दिवस, आध्यात्मिक शिक्षण संस्था महड येथे सुरू असून लहान मुलांच्यावर त्यांच्या मनावर उत्तम संस्कार देण्याचे काम या संस्थेचे अध्यक्ष रामदास पाटील व ज्ञानेश्वर पाटील हे करीत आहे. गेल्या अनेक वर्ष त्या ठिकाणी सातत्याने बालसंस्कार होत असून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आणि संत साहित्याचा प्रचार करण्यासाठी तसेच प्रत्येकाला आपल्या भारतीय संस्कृतीची मूल्ये जोपासण्यासाठी कोवळ्या मनावर संस्कार घडविले जाते. टाळ, मृदुंग, पखवाज, तबला, प्रवचन, कीर्तन त्यांना शिकविले जात आहे. त्याच बरोबर शरीरयष्टी कमवा, व्यसनापासून अलिप्त राहा, असे मार्गदर्शन केले जात आहे. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येतअसते.शिबिरात प्रार्थना, योग, संस्कार वर्ग, कथा-कथन, श्लोक पठण, देशभक्तीपर गीत, व्यक्तिमत्त्व विकास, नैतिक शिक्षण तसेच सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली जात आहे. याशिवाय मुलांमध्ये शिस्त, सामाजिक बांधिलकी व सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यावर भर देण्यात येतो. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे उपक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचे पालकांनी व्यक्त केले.

# कोकणात पावसाचा अंदाज

## बागायतदार धास्तावले; आंबा काढणीची लगबग



**। रायगड । प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे आधीच संकटात सापडलेला कोकणातील आंबा बागायतदार आता पुन्हा एकदा मोठ्या चिंतेत सापडला आहे. हवामान विभागाने कोकण विभागात पावसाचा अंदाज वर्तवला असून, यामुळे बागायतदारांची धडधड वाढली आहे. जर वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, तर हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने कोकण किनारपट्टी आणि मुंबई परिसरातील जिल्ह्यांसाठी अधिकृत हवामान अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजानुसार, कोकणात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वाऱ्याचा यलो अलर्ट देण्यात आला असून, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातही काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात आंबा लागवडीखालील क्षेत्र ४२ हजार हेक्टर आहे. त्यापैकी १४ हजार ५०० हेक्टर क्षेत्र उत्पादनक्षम आहे. मात्र यंदाच्या हंगामात निसर्गाच्या लहरीपणामुळे आंब्याचे उत्पादन आधीच कमालीचे घटले आहे. अनेक भागांत झाडांवर मोजकाच आंबा शिल्लक आहे. त्यातच अजूनही बहुतांश बागायतदारांचा आंबा काढणीचा अंतिम टप्पा बाकी आहे. अशा परिस्थितीत जर वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला, तर झाडावर राहिलेला आंबा मोठ्या प्रमाणावर गळून पडेल, असा भीतीयुक्त अंदाज वर्तवला जात आहे.

पावसामुळे केवळ आंबा गळतीचेच संकट नाही, तर बाजारातील गणितेही बिघडण्याची शक्यता आहे. पाऊस पडल्यास आंब्याची गुणवत्ता घसरते, डाग पडतात आणि तो सडण्याचा धोका वाढतो. परिणामी, बाजारात आंब्याचे दर कमालीचे कोसळू शकतात. आधीच कमी उत्पादनामुळे आर्थिक अडचणीत असलेला बागायतदार, दर घसरल्यास पूर्णपणे कोलमडून जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. सध्या बागायतदार हवामानाचा अंदाज घेऊन जसा जमेल तसा आंबा उतरवून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी लगबग करत आहेत, परंतु, निसर्गाच्या या लहरीपणापुढे आता बागायतदार हतबल झाले असून, सर्वांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

### बागायतदारांना प्रशासनाचे आवाहन

विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह होणाऱ्या या पावसामुळे आंबा, काजू तसेच काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच वादळाच्या वेळी झाडांखाली किंवा खुल्या मैदानात आश्रय घेणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये वाढत्या प्रदूषणाने श्वसन विकारात वाढ

## ■ छातीरोग तज्ज्ञ डॉ. विनोद चव्हाण



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे नुकतेच क्रॉनिक कफ (दीर्घकालीन खोकला) या विषयावर ओलेंडर फार्म येथे वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कोकिलाबेन हॉस्पिटलचे प्रख्यात छाती रोगतज्ज्ञ डॉ. विनोद चव्हाण हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. विनोद चव्हाण यांनी कर्जत परिसरात श्वसनविकाराच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याची चिंता व्यक्त केली. पूर्वी निसर्गरम्य असलेले कर्जत आता मुंबई पुण्यासारखे प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. कर्जतमध्ये वाढते बांधकाम, विकासकामे तसेच मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड यामुळे प्रदूषण वाढत असून त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण संवर्धनासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांना आणि प्रशासनाला आवाहन केले.

कार्यक्रमाला डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ.मनोहर साबणे, डॉ. प्रेमचंद जैन, डॉ. हेमंत गांगोलिया, डॉ. बी.जी.लाड , डॉ. सुहास शितुत, डॉ. आशिष कर्वे, डॉ. रितेश जैन, डॉ. राहुल ओसवाल, डॉ. कुमार ओसवाल, डॉ. विकास गोमारे, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. दिगंबर पवार, डॉ. गजानन चव्हाण तसेच असोसिएशनचे सदस्य आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. शेवटी डॉ. गणेश मेंगाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात राज्यभर आंदोलन

## पेण मेडिकल असोसिएशनचाही सहभाग



**। पेण । प्रतिनिधी ।**

ऑनलाईन औषध विक्रीला विरोध दर्शवत आज राज्यभरातील मेडिकल असोसिएशनने एकदिवसीय आंदोलन पुकारले असून त्यामध्ये पेण मेडिकल असोसिएशननेही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. तालुक्यासह जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांनी या आंदोलनाला पाठिंबा देत ऑनलाईन औषध विक्रीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भूमिका मांडली.

ऑनलाईन औषध विक्रीमुळे वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधे सहज उपलब्ध होत असून त्याचा गैरवापर वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली. तसेच बनावट औषधे, मुदतबाह्य औषधांची विक्री आणि डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांचा पुरवठा यामुळे रुग्णांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, असे मत औषध विक्रेत्यांनी व्यक्त केले.

पेण मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पारंपरिक मेडिकल व्यवसाय हा केवळ व्यापार नसून तो आरोग्य सेवेशी निगडित महत्त्वाचा घटक आहे. स्थानिक मेडिकल चालक रुग्णांना तातडीने औषधे उपलब्ध करून देतात, तसेच योग्य मार्गदर्शनही करतात. मात्र ऑनलाईन विक्रीमुळे छोट्या औषध विक्रेत्यांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अनेक मेडिकल दुकानदारांनी प्रतीकात्मक स्वरूपात कामकाज बंद ठेवत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात कठोर नियमावली तयार करून स्थानिक औषध विक्रेत्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी तालुका सेक्रेटरी उदय म्हात्रे, तालुका अध्यक्ष मितेश शहा, जिल्हा प्रतिनिधी हेलेंद्र शहा, शंशाक पाटील, किशोर पाटील आदी उपस्थित होते.

# श्रीवर्धन तालुक्यासह शहरातील औषध विक्रेत्यांचा कडकडीत बंद



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा केमिस्ट आणि डिस्ट्रीब्यूटर असोसिएशन आणि श्रीवर्धन तालुका केमिस्ट आणि डिस्ट्रीब्यूटर असोसिएशन या औषध विक्री करणाऱ्या संघटनांनी आज ऑनलाईन औषध विक्री बाबत विरोध दर्शविण्यासाठी कडकडीत बंद पाळला होता.

ऑनलाईन औषध विक्रीमध्ये नागरिकांना कोणत्या प्रकारची औषधे उपलब्ध करून दिली जातात व दिली जातील याबाबत साशंकता असून सदर ऑनलाईन औषध विक्री करणारे हे फार्मासिसच्या देखरेखीखाली औषध विक्री करतात का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ऑनलाईन औषध विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणावरती घोटाळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एक्सपायरी झालेली औषधे देखील विक्री होऊ शकतात. तरी शासनाने ऑनलाईन औषधे विक्रीवर करण्यावरती तातडीने बंदी आणावी. अशी आग्रही मागणी या औषधी विक्रेत्यांनी केली आहे.

श्रीवर्धन तालुक्यासह शहरातील सर्व औषध दुकाने बंद ठेवण्यात आली होती. मात्र अत्यावश्यक सुविधा पुरविण्यात येणार असल्याबाबत औषध विक्रेत्यांनी अगोदरच जाहीर केले होते. श्रीवर्धन बाजारपेठेतील सिरोया मेडिकल समोर सर्व औषध विक्रेत्यांनी एकत्र जमुन काळ्याफिती लावून ऑनलाइन औषध विक्री थांबविण्यासाठी घोषणा दिल्या. यावेळी श्रीवर्धन तालुका केमिस्ट आणि डिस्ट्रीब्यूटर असोसिएशनचे अध्यक्ष साजन मापुस्कर, सचिव श्रीकांत तोडणकर व रायगड जिल्हा केमिस्ट आणि डिस्ट्रीब्यूटर ललित सिरोया व सर्व औषध विक्रेते उपस्थित होते.

# ‘चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका’

**रायगड** : ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ या योजनेंतर्गत ई-केवायसी करु न शकलेल्या महिलांना जिल्ह्याच्या महिला विकास विभागात कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश शासनस्तरावरुन देण्यात आलेले नाहीत व तसे कोणतेही निर्णय शासनाने घेतलेला नाही. ही बातमी प्रसिद्ध होत असून ती खोटी आहे. त्यामुळे वस्तुस्थिती लक्षात घेता अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवण्यात येवू नये, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी केले आहे.

# वाघरे शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक क्षेत्रात मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर यश संपादन करता येते, याचे उत्तम उदाहरण देत इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५२६ मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येवैदेही रुपाली दीपक तेटगुरे, प्रिन्स प्रिया प्रकाश कांबळे, रिया समिता सचिन वनरसेयांचा समावेश असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळविले आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच शाळा व्यवस्थापनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते. भविष्यातही ही मुले शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, प्रशासकीय मंडळ, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच पालकांनी अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या नावाला नवी उंची मिळाली असून, संपूर्ण परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# स्वच्छतादूत राकेश कोकळे यांचा गोव्यात सन्मान



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

लायन्स इंटरनॅशनल या संस्थेच्या वतीने माथेरानचे स्वच्छता दूत म्हणून ओळखले जाणारे तसेच माथेरान धनगर समाजाचे अध्यक्ष राकेश विलास कोकळे यांचा विशेष सन्मान करून गौरविण्यात आले त्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गोवा येथे आयोजित कार्यक्रमात पद्मश्री पुरस्कार विजेते, पर्यावरण तज्ज्ञ व माजी शास्त्रज्ञ डॉ. शरद काळे तसेच मूर्त्यूजा माथेरानवाले यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.त्यांचा नुकताच गोवा येथील आयोजित कार्यक्रमात सत्कार समारंभ पार पडला,

हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे माथेरान शहराध्यक्ष तथा समाजसेवक राकेश कोकळे यांनी माथेरानच्या स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी मोलाचे योगदान दिले आहे. माथेरानचा परिसर नेहमी स्वच्छ आणि सुंदर राहावा यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात.

गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह माथेरानमधील जंगल परिसरात पडलेल्या प्लास्टिक पिशव्या, बाटल्या व इतर घनकचरा उचलून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत लायन्स इंटरनॅशनल संस्थेच्या वतीने गोवा येथे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

स्वच्छतादूत राकेश कोकळे यांच्या या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी पद्मश्री पुरस्कार विजेते पर्यावरण तज्ञ् डॉ शरद काळे, लायन्स मुर्त्यूजा माथेरानवाले, संस्थेचे सीआयडी डायरेक्टर व्ही. व्ही. कृष्णा रेड्डी, इंटरनॅशनल डायरेक्टर रामचंद्र बेंगलोर, गव्हर्नल जय अमोल नाईक, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# नवी मुंबईत ग्लोबल बिझनेस समिट २०२६ चे आयोजन यशस्वी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन मुंबई मधील यू बिझनेस मीट यांच्या वतीने आयोजित नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील उद्योजकांनी उपस्थित रहात या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भारत आणि थायलंड यांच्या दरम्यान व्यापार उद्योजकता वृद्धिंगत व्हावी या हेतूने या बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले होते.

विविध व्यवसाय आस्थापनांना व्यवसाय सुलभता प्रदान करण्याच्या हेतून यू बिझनेस मिट ही संस्था काम करत असते. फाउंडर वैभव सोनटक्के आणि को फाउंडर रवींद्र प्रताप गुप्ता,मंदार दोंदे, विवेक पाटील, समृद्धी वाणी यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड यांच्यामध्ये द्विदेशीय व्यवसाय सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यामध्ये एक्सपोर्ट इम्पोर्ट, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, फार्मसीटीकल्स, लाइफस्टाइल अँड हेल्थकेअर, बँकिंग, इन्शुरन्स, इंटरनॅशनल मीडिया, रिअल इस्टेट, हॉटेल अँड हॉस्पिटॅलिटी, टुरिझम अशा क्षेत्रातील तज्ञ मंडळींच्या पॅनल डिस्कशनचे आयोजन करण्यात आले होते.

यू बिझनेस मिट यांच्या वतीने व्हर्च्युअल स्टुडिओ, मीटिंग रूम आणि एमओयू साईन करण्याकरता लीगल टीम देखील तैनात केली होती. अनेक उद्योजकांना या सुविधांचा लाभ झाला. बेलापूर येथील दि पार्क या तारांकित हॉटेलमध्ये हे समिट संपन्न झाले. निलेश म्हात्रे यांनी आवर्जून उपस्थित रहात नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. थायलंड येथून सदस्य तथा माजी राजदूत थाराडोल थाँगग्रंग आणि पिटा सदस्य नरेन पियासच्चादेश हे उपस्थित होते.

एक्सपोर्ट इम्पोर्ट क्षेत्रामधील एक अग्रगण्य नाव असणारे ओमकार हरी माळी यांची चित्तरंजन टेंभेकर यांनी घेतलेली मुलाखत या समिटचे विशेष आकर्षण ठरली. तळोजा इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांची रवींद्र प्रताप गुप्ता यांनी घेतलेली मुलाखत देखील लक्षवेधी ठरली. अनेक मान्यवरांनी ग्लोबल समिट आयोजनामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

## नेरळ पोलिसांची यशस्वी कारवाई | चार जणांना अटक करून मुद्देमाल हस्तगत

# दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीच्या आवळल्या मुसक्या




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात येऊन मोटर सायकल चोरी करून धुमाकूळ घालणारी टोळी रायगड पोलिसांकडून गजाआड करण्यात आली.नेरळ पोलिसाची गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही धडाकेबाज कामगिरी करीत मोटरसायकल चोरी करून धुमाकूळ घालणारी टोळीचा बीमोड करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील तसेच मुरबाड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मोटार सायकल चोरी प्रकरणे नोंद करण्यात आली होती.

फिर्यादी यांची सुझुकी कंपनीची एक्सेस १२५ मॉडेलची स्कूटी नंबर एम एच ४६ सी क्यू ७४०६ ही गाडी नेरल बाजारपेठ अमन मटन शॉप येथे पार्किंग करून ठेवली असता, अज्ञात चोरट्याने स्वतःच्या फायद्याकरता चोरून नेली म्हणून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेरळ-मुरबाड परिसरातील मोटरसायकल चोरी करून धुमाकूळ घालणारे टोळी रायगड पोलिसांकडून गजाआड करण्यात आली. या कारवाईमुळे रायगड पोलिसांचे कौतुक करण्यात आले आहे. नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने गुन्ह्यातील अज्ञात आरोपी हे म्हसा तालुका मुरबाड जिल्हा ठाणे ग्रामीण येथील राहणार असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सापळा रचून चार आरोपींना अटक करण्यात आली.

त्यामध्ये आरोपी करण अनिल शिनगारे, सुजल सुभाष जाधव, विधीसंघर्षित बालक, विधीसंघर्षित बालक असे असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना पोलीस कोठडी मंजूर करून घेतल्यानंतर गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपींनी नेरळ बाजारपेठ, पोई गाव आणि पाटगाव या तीन ठिकाणावरून तीन मोटरसायकल चोरी केल्या असल्याची कबुली दिली आहे.

आरोपींनी दिलेल्या कबुलीनुसार खात्री केली आणि गुन्ह्याची उकल केली. अटक आरोपींनी नेरळ पोलीस ठाणे, मुरबाड पोलीस ठाणे हद्दीतून चोरी केलेल्या एकूण तीन मोटरसायकल असा ९१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या कारवाईसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत राहुल गायकवाड, नेरळ पोलीस ठाणे सह पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सुशील काजलेकर, पोलीस हवालदार वाघमारे, पोलीस शिपाई केकाण, पोलीस शिपाई बेंद्रे, पोलीस शिपाई वांगनेकर या पथकाकडून कारवाई करण्यात आली.




## राशीभविष्य

- **मेष** : कामात अपेक्षित प्रगती होईल. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल. शिक्षण क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृषभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. सरकारी कामं रखडतील. कलाकारांचा उत्साह वाढीस लागेल.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं. मुलांच्या प्रश्नांचा ताण राहील. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **कर्क** : सुवार्ता कानी येईल. व्यवसायात नवे बदल हितकर ठरतील. प्रेम प्रकरणात वाद-विवाद संभवतात.
- **सिंह** : कामाचं योग्य मोल होईल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. सांस्कृतिक क्षेत्रात संधी चालून येतील.
- **कन्या** : गुंतवणूक लाभदायक ठरेल. नव्या कामांमुळे उत्साह वाढेल. वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा.
- **तूळ** : हितशत्रूंच्या कारवाया वाढतील. आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **वृश्चिक** : प्रापंचिक समस्या हैराण करतील. जुनी येणी रखडतील. स्थावर प्रश्नात अडचणी वाढणार आहेत,
- **धनु** : घरगुती उद्योगात अनुकूलता राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **मकर** : चैनीवर अधिक खर्च होईल. घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. गुंतवणुकीचा विचार तुर्तास करू नये.
- **कुंभ** : मनाजोग्या घटना घडतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. स्थावर प्रश्नाचा गुंता वाढू शकतो.
- **मीन** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. मनाजोग्या घटना घडतील. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळेल.

## दिनविशेष
### २२ मे

**१९९१** : साम्यवादी नेते, कामगार पुढारी श्रीपाद अमृत डांगे यांचे निधन.
**२००३** : प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ नीतू मांडके यांचा मृत्यू.
**२०१३** : मालेगाव बॉंबस्फोटप्रकरणी रामचंद्र कालसंग्रा या फरारी आरोपीसह चार जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल.
**२०१७** : कोळसा गैरव्यवहारप्रकरणी माजी कोळसा सचिव एच.सी.गुप्ता यांना दोन वर्षे तुरुंगवास.
**२०१८**: भारताने ब्राह्मोसचे सलग दुसऱ्या दिवशी यशस्वी चाचणी घेतली.

## आरोग्यमंत्र
### तोंडाला दुर्गंधी येतेय?

कितीही स्वच्छता पाळली तरी तोंडाला दुर्गंधी येत असल्याची तक्रार अनेक जण करतात. समाजात वावरताना ही बाब न्यूनगंड निर्माण करणारी ठरत असल्याची त्यांची खंत असते. एकंदरच तोंडाची दुर्गंधी ही मोठी समस्या असते. अर्थात दातांची आणि तोंडाची योग्य पद्धतीने स्वच्छता राखली तर ही समस्या टाळता येते. बॅक्टेरियांच्या प्रादूर्भावामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या उत्पन्न होते. कॅविटिज तसंच हिरड्यांच्या विकारामुळेही तोंडाला दुर्गंधी येते. यापासून बचाव करण्याच्या पद्धतींविषयी...



✻ भरपूर पाणी प्या, खाल्ल्यानंतर चूळ भरा. पाण्यामुळे बॅक्टेरियांचं प्रमाण कमी होतं. सोडा, एनर्जी ड्रिंक, कोल्ड ड्रिंक अशा सायट्रिक ॲसिडयुक्त पेयांमुळे तोंडाची दुर्गंधी वाढते. त्यामुळे अशी पेयं टाळा.

✻ कमी कर्बोदकं असणारा आणि फॅट्स तसंच प्रथिनयुक्त आहार घ्या. आहारात हेल्दी कार्बस असू द्या. यामुळे शरीरातल्या फॅट्सचं प्रमाण नियंत्रणात राहतं आणि श्वासाची दुर्गंधी कमी होते.

✻ दररोज दोन वेळा दात घासा. जेवल्यानंतर दातांमध्ये अन्नकण अडकून बसतात. या अन्नकणांमुळे बॅक्टेरियांची वाढ होते आणि तोंडाला दुर्गंधी येते.

✻ अल्कोहोल फ्री माउथ वॉशचा वापर करा. बॅक्टेरियांमुळे आपलं तोंड कोरडं पडतं. त्यामुळे माउथवॉशचा नियमित वापर करा.

## सफर देशांची
### असा आहे सीएआर

सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक(सीएआर) हा मध्य आफ्रिकेतला देश आहे. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या या देशाचा बराचसा भाग पठारी आहे. २,४०,००० चौरस मैल एवढा या देशाचा भूभाग आहे. बँगुई ही या देशाची राजधानी. या देशाच्या दक्षिणेला घनदाट जंगलं आहेत. या जंगलांमध्ये दुर्मिळ गोरिला आढळतात. या देशातले लोक प्रामुख्याने फ्रेंच भाषा बोलतात. बँडा आणि बाया या जमातीचे लोक या देशात रहातात. इथले लोक शेती करतात. मात्र बरेचदा या प्रदेशात दुष्काळी परिस्थिती असते. इथे हिरे आणि युरेनियमच्या खाणी आहेत. यासोबतच कापूस, कॉफी, लाकूड या वस्तूंचीही निर्यात होते. सीएफए फ्रँक हे या देशाचं चलन आहे. १९६० पर्यंत या भागावर फ्रान्सचं राज्य होतं. त्यामुळे इथले लोक फ्रेंच भाषा बोलतात. सांगो ही इथली अधिकृत भाषा आहे. या देशातली आठ टक्के जमीन जंगलाने व्यापली आहे. या देशात ३६०० प्रजातींची झाडं, ६६३ प्रजातींचे पक्षी आणि विविध प्रकारचे प्राणी पहायला मिळतात. या देशात पाच राष्ट्रीय उद्यानं आणि ३३ संरक्षित प्रकल्प आहेत. बोअली हा इथला प्रसिद्ध धबधबा आहे. बास्केटबॉल आणि फुटबॉल हे इथले लोकप्रिय खेळ आहेत.

## स्टाईल स्टेटमेंट
### साड्यांचे हटके रंग

बाजारात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी साड्या मिळत असल्या तरी महिलांच्या वॉर्डरोबमध्ये लाल, हिरव्या, निळ्या रंगांच्या शेड्स पहायला मिळतात. त्याच त्या रंगाच्या साड्या नेसून कंटाळाही येतो. काहीतरी वेगळं ट्राय करावंसं वाटतं. पण साड्यांच्या रंगांमध्ये एक्सपरिमेंट करताना मनात थोडी धाकधूकही असते. तुम्ही प्रयोगशील असलात तर साड्यांचे हे रंग नक्कीच ट्राय करता येतील.

✻ ब्लॅक अँड व्हाईट रंगाच्या साड्या कधीही नेसता येतील. हे कॉम्बिनेशन खूप छान दिसतं. कोणत्याही वयाच्या महिला ब्लॅक अँड व्हाईट साड्या कॅरी करू शकतात. ग्रे अँड ब्लॅक हे कॉम्बिनेशनही छान दिसेल. या साड्यांवर कॉन्ट्रास्ट ब्लाउज घालता येईल.

✻ मंजेटा रंग प्रत्येक वर्णावर शोभून दिसतो. समारंभ सकाळी असो किंवा रात्री, तुम्ही हा रंग कॅरी करू शकता. शिफॉन फॅब्रिकमधली मजेंटा साडी निवडा. प्लेन साडीवर फ्लोरल किंवा प्रिंटेड ब्लाउज घाला आणि प्रिंटेड साडीवर प्लेन ब्लाउज कॅरी करा. **(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, २२ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. ६/७,
चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : आश्लेषा, योग : वृद्धि,
सूर्योदय ६.०४, सूर्यास्त ७.०७

## फॉरवर्ड्स

**अज़ीब कश्मकश हैं इस दौर-ए-गुफ़्तगू में...**

**हम चुप रहें तों मग़रूर ठहरें औऱ बोलें तों बदतमीज़...!**

## फॅशन पॅशन

उन्हाळ्यात मुलांच्या ॲक्सेसरींमध्ये टोपीला खूप महत्त्व असतं. विविध प्रकारच्या, आकाराच्या फॅन्सी टोप्या ट्रेंडमध्ये आहेत. पेहरावानुसार टोपीची निवड करायची आहे हे लक्षात ठेवा.

बाजारात नजर टाकली तर बेसबॉल कॅप्स, फाईव्ह पॅनल कॅप्स, ड्रायव्हर सीट कॅप्स, ट्रकर्स कॅप अशा कॅप्सच्या भरपूर व्हरायटी पहायला मिळतील. बेसबॉल कॅप्स गेल्या अनेक वर्षांपासून वापरात आहेत. बेसबॉल या खेळामुळे १९०० व्या शतकापासूच या प्रकारच्या कॅप्सना लोकप्रियता मिळाली. त्यामुळे ही कॅप मुलांच्या वॉर्डरोबचा अविभाज्य भाग झाली. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### औषधनिर्माण क्षेत्रातल्या संधी

विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या अनेकांचा वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि आय.टी. क्षेत्राकडे ओढा असतो. परंतु त्यामानाने फार्मसीकडे जाणाऱ्यांची संख्या कमी असते.



वास्तविक या शाखेतही कारकिर्दीच्या अनेक चांगल्या संधी निर्माण होऊ शकतात. फार्मसीला 'औषध निर्माण शास्त्र' म्हणतात. या शाखेचं शिक्षणही अतिशय महत्त्वाचं आहे. मात्र या क्षेत्राविषयी अनेकांना व्यापक प्रमाणात माहिती नसते. फार्मासिस्ट म्हणजे औषधाच्या दुकानात चिठ्ठ्या वाचून औषधं देणारे एवढ्यापर्यंतच सामान्य माणसाचं या विषयीचं ज्ञान मर्यादित आहे. बऱ्याच लोकांना यापलीकडे फार्मासिस्टची काही कामं असतात याचीही माहिती नसते. मात्र हे सगळे गैरसमज दूर सारायला हवेत. अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाला नाही तर या अभ्यासक्रमाकडे वळण्याची मानसिकता बदलायला हवी. हा अतिशय महत्त्वाचा आणि खर्चिक असा अभ्यासक्रम आहे. त्याची उपयुक्तताही खूप मोठी आहे. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे औषधं तयार करणं, औषधांची मिश्रणं बनवणं ही कामंही फार्मासिस्ट करू शकतात. ही औषधे बनवताना त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांची माहिती त्यांना असते.

## खेचाखेची
### औषधं

डॉक्टर म्हणतात, भरपूर फळं आणि हिरव्या भाज्या खायला सुरूवात करा. म्हणजे कधीच औषधं खावी लागणार नाहीत.

आता त्यांना कोण समजावून सांगणार, की...

हल्ली फळं आणि हिरव्या भाज्या स्वत:च औषधं खाऊन बाजारात येतात म्हणून!

## वेगळं काही

नेदरलँडची राजधानी ॲमस्टरडॅममध्ये लाखोंच्या संख्येने पर्यटक दाखल होतात. यामुळे स्थानिकांना बराच त्रास सहन करावा लागतो. या शहराचं सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करतं. मध्यंतरी इथल्या पर्यटकांची संख्या इतकी वाढली होती की या देशाच्या सरकारने पर्यटनविषयक जाहिरातींवर बंदी आणायचा निर्णय घेतला. ॲमस्टरडॅममधले लोक पर्यटकांच्या या ओघाने खूप वैतागले होते. पर्यटकांच्या मोठ्या संख्येमुळे शहरातल्या सुविधांवर प्रचंड ताण येतो. त्यातच या गर्दीचं नियोजन करणंही कठीण होऊन बसतं. अशा परिस्थितीत ॲमस्टरडॅमसारख्या सुंदर शहराची वाताहत होऊ नये, म्हणून काही कठोर निर्णय घेण्याची गरज असल्याचं नेदरलँड सरकारचं म्हणणं आहे.

## रुचिरा
### मँगो चीजकेक

आंबा हे उन्हाळ्यातलं महत्त्वाचं आकर्षण असतं. मुबलक मिळणाऱ्या आंब्याचा वापर करुन विविध पाककृती बनवता येतात. आपण मँगो चीजकेक कसा बनवायचा ते पाहू या...



सामग्री – २० गोड बिस्किटं, पाव वाटी बटर, एक टेबलस्पून पिठीसाखर, एक वाटी मँगो पल्प, एक वाटी साखर, चवीपुरतं मीठ, चार अंड्यांचा बलक, तीन टेबलस्पून जिलेटीन, दोन वाट्या क्रीम, दोन वाट्या दही, आंब्याच्या फोडी इत्यादी.

कृती– बिस्किटांचा चुरा करून त्यात बटर आणि थोडी पिठीसाखर मिसळावी. मिश्रण एकजीव करुन केकच्या भांड्यात पसरुन घ्यावं. अर्धा कप पाण्यात जिलेटिन घालून सेट करायला ठेवावं. एका पातेल्यात मँगो पल्प, साखर, मीठ आणि अंड्याचा बलक एकत्र करुन मिश्रण मंद आचेवर एकजीव करून घ्यावं. गरम असतानाच मिश्रणात जिलेटिन मिसळून पातेलं गॅसवरून उतरवून घ्यावं. थंड झाल्यावर त्यात क्रीम घालावं. त्यानंतर दही मिसळावं. आता ते बिस्किटांच्या थरावर पसरून घ्यावं आणि सेट करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवावं. सर्व्ह करताना आंब्याच्या फोडींची सजावट करावी.

## सुडोकू १०६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १ | ५ | | | | | | |
| ७ | | | ५ | ८ | १ | | ४ | |
| | | | | ९ | | ५ | १ | |
| | | | | ४ | ७ | ३ | | २ |
| ६ | | | | | | | | ४ |
| ४ | | ८ | ६ | १ | | | | |
| | ६ | ७ | | ५ | | | | |
| | ८ | | १ | ३ | ९ | | | ६ |
| | | | | | | ८ | २ | १ |

**टीप** -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १ | ३ | ५ | ४ | ९ | ७ | ६ | २ |
| ७ | ९ | ६ | २ | ३ | ८ | १ | ४ | ५ |
| ५ | २ | ४ | ७ | १ | ६ | ८ | ३ | ९ |
| ४ | ७ | ५ | ६ | २ | १ | ३ | ९ | ८ |
| ६ | ३ | ९ | ४ | ८ | ७ | ५ | २ | १ |
| २ | ८ | १ | ९ | ५ | ३ | ४ | ७ | ६ |
| ९ | ५ | ८ | ३ | ७ | २ | ६ | १ | ४ |
| ३ | ४ | २ | १ | ६ | ५ | ९ | ८ | ७ |
| १ | ६ | ७ | ८ | ९ | ४ | २ | ५ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १०६

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | ■ | ७ | ८ | | ९ | १० | ■ |
| | ■ | ११ | | १२ | ■ | | ■ | १३ | १४ | | | ■ | १५ | | १६ |
| १७ | १८ | | ■ | १९ | | | | | | ■ | २० | २१ | | ■ | |
| ■ | | ■ | २२ | | ■ | | ■ | २३ | | | ■ | | ■ | २४ | |
| २५ | | | | ■ | २६ | ■ | ■ | ■ | | ■ | २७ | | २८ | | ■ |
| २९ | | ■ | ३० | ३१ | | ३२ | ■ | ३३ | ■ | ३४ | | ■ | | ■ | ३५ |
| | ■ | ३६ | ■ | | ■ | ३७ | | | ■ | | ■ | ३८ | | | |
| ३९ | ४० | ■ | ४१ | | ■ | | ■ | ४२ | | ■ | ४३ | | ■ | ■ | |
| ■ | ४४ | | | ■ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | | ■ | ४८ | | |
| ४९ | | ■ | ५० | ५१ | | ५२ | ■ | | ■ | ५३ | | ५४ | | ■ | ■ |
| | ■ | ५५ | | | ■ | | ■ | ५६ | ५७ | | ■ | ५८ | | ५९ | ■ |
| ६० | | | ■ | ६१ | | | ६२ | ■ | | ■ | ६३ | | ■ | ६४ | ६५ |
| ■ | ■ | ६६ | | | ■ | ■ | ६७ | | | ६८ | | ■ | ६९ | | |
| ७० | ७१ | ■ | ■ | | ■ | ७२ | | ■ | ■ | ७३ | | ७४ | | ■ | |
| ७५ | | ■ | ७६ | | ७७ | ■ | ७८ | ७९ | ८० | | ■ | ८१ | | ८२ | ■ |
| | ■ | ८३ | | ■ | ८४ | | ■ | ८५ | | ■ | ८६ | | ■ | ८७ | |

**आडवे शब्द :-**
१) आंब्यातील पेय
४) फुरसत
७) धोकादायक
११) वचक
१३) जपजाप्य
१५) तृण,चारा
१७) भारतीय सैनिक
१९) अखबार
२०) दृष्टी २२) उत्सव २३) प्रवेशकर
२४) गळ्याचा मागचा भाग,प्रतिष्ठा
२५) पायाला भेगा पडण्याचा आजार
२७) स्वयंपाकाचे शास्त्र
२९) वेल,वल्लरी
३०) समशेर
३४) मूल
३६) गाय
३७) अंजनाचा एक प्रकार
३८) प्रतिध्वनी
३९) नूतन
४१) आई
४२) काळजी, फिकीर
४३) हिंदीत पुन्हा
४४) सारखा
४५) खोटे कारण
४७) छाती
४८) पोथी गुंडाळून ठेवण्याचे वस्त्र
४९) विविध
५०) सिंह
५३) रवाळ,कणीदार
५५) एक तारवाद्य
५६) शोध,माग
५८) उजाड,ओसाड
६०) कमी करणे
६१) ऋणको
६३) वाळवंट
६४) मनाचा ओढा
६६)कन्या
६७) विवाहित स्त्रीचे माहेरी राहण्यास येणे
६९)सैन्य,कडे
७०) सरळमार्गी,छक्केपंजे नसलेला
७२) प्रेत
७३) हालचाल,आंदोलन
७५) नातेवाईक
७६) नफा ( हिं.)
७८) मुसलमानांचा उपवासाचा महिना
८१) सैन्याला मालपुरवठा
८३) नरमांजर
८४) अंतरिक्षात जाणारे वाहन
८५) एक मिश्रधातू
८६) मोठा हातोडा
८७) सामान,वस्तू

**उभे शब्द :-**
१) ध्वनी
२) दात
३) मोठा सरळ बांबू
५) नवरदेवाची आई
६) मोजकेपणा,मितता
७) पत्र (हिं.)
८) सूर्याचे एक नाव
९) सुसंस्कृत,शहाणा
१०) मिठी
१२) दशानन
१४) बातमीदार
१६) तृष्णा
१८) बडबड,क्रियेविण ✻✻✻✻ व्यर्थ आहे
२१) सीतेचे वडील
२२) सदोदित
२४) हिंदीत फुलांची माळ
२५) जहाज,होडी वगैरे वाहन २६) मत्सर
२७) ओटा कट्टा
२८) दरवाजा
३१) पार्वतीचे एक नाव
३२) कप्पा,खण
३३) धावत-धावत
३४) बैलाचा एक सण
३५) भारताचे एक बेट
३८) पंख ४०) वाईट इच्छा
४१) माणुसकी
४३) भटकणे, मागे येणे
४५) सगळा,कर
४७) निराश
४८) छोटा
४९) चित्रपटाचा हिरो
५१) पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
५२) तंबाखू
५४) मोठी जाड सुई
५५) सदोदित
५७) खुंटी,पातळ, निमुळती चपटी पट्टी
५९) च्या सह
६१) रमापती
६३) रसदार
६५) अर्धे अंग लुळे पडणे
६८) पक्के आश्वासन
७०) श्वशुर
६९) शिखराचे टोक
७०) श्वशुर ७१) दोरा
७४) एक कालवण
७६) बोलता न येणारा
७७) अत्तराचा बोळा
७९) मला
८०) अतिशय,पुष्कळ
८२) एक श्वासरोग

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ना | गो | बा | ला | दू | ध | ■ | उ | द | र | ■ | को | जा | गि | री | ■ |
| रा | वा | ■ | डा | ■ | रा | स | भ | ■ | म | हि | ला | ■ | र | ■ | वा |
| ज | ■ | बा | व | रा | ■ | मा | य | बो | ली | ■ | ह | रि | णी | ■ | व |
| ■ | चां | ग | ले | ■ | ज | न | ता | ■ | ■ | ह | ल | का | ■ | फ | ट |
| वा | दी | ■ | ला | ड | का | ■ | ■ | स | म | स्त | ■ | म | ■ | रा | ळ |
| लु | ■ | पं | ■ | बा | त | मी | दा | र | ■ | ■ | सा | टे | लो | टे | ■ |
| का | र | खा | ना | ■ | ■ | न | म | दा | ■ | ज | न | क | ■ | ■ | ओ |
| म | द | ■ | पा | ■ | सु | के | ■ | र | वा | ळ | ■ | डा | ल | न | ■ |
| य | ■ | को | स | रा | ■ | त | ळ | ■ | सा | ज | रा | ■ | ■ | र | स्सी |
| ■ | का | ळ | ■ | ज | न | न | ■ | दी | ■ | ळी | ■ | हा | तो | डी | ■ |
| अ | व | सा | न | घा | त | ■ | क | र | व | त | ■ | ल | ■ | चा | नी |
| ■ | का | ■ | ■ | ट | म | ट | म | ■ | र | ■ | दे | ह | ■ | घो | र |
| अ | व | य | व | ■ | स्त | ■ | र | मा | व | र | ■ | वा | त्र | ट | ■ |
| व | ■ | म | ■ | च | क | म | क | ■ | र | सा | त | ल | ■ | घे | णे |
| स | ड | क | छा | प | ■ | द | स | रा | ■ | त | ■ | ■ | गा | णे | ■ |
| ■ | फ | ■ | प | टा | ई | त | ■ | म | ज | ल | ■ | रो | ज | ■ | वा |

